


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २१० ■ शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




# अकोल्यात ॲम्बुलन्सची सेवा कमी, दहशतच जास्त !

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**अकोला :** रुग्णांना जीवनदान देण्यासाठी असलेली ॲम्बुलन्स सेवा अकोला शहरात आता सामान्यांसाठी दहशतीचा आणि लुटीचा अड्डा बनली आहे. शहरात ॲम्बुलन्स चालकांकडून नियमांची पायमल्ली होत असताना आरटीओ आणि शहर वाहतूक शाखा मात्र डोळे झाकून बसली आहे का? असा संतप्त सवाल आता अकोलेकर विचारत आहेत. तर या यंत्रणेचा आशिर्वादातून हे सर्व होत आहे काय असा प्रश्न उपस्थित होत आहे. थेट लाल दिव्यांचा गैरवापर करत शहरात सायरन वाजवत फिरणाऱ्या ॲम्बुलन्स कोणाच्या असा प्रश्न उपस्थित होत असून रुग्ण नसताना रस्त्याने जाणाऱ्या सामान्य नागरिकांमध्ये भिती निर्माण करणाऱ्या ॲम्बुलन्स चालक व मालकांवर गुन्हा दाखल करण्याची गरज आहे. पण, पोलिस प्रशासन आणि आर टी ओ यांचे आर्थिक लागेबंध आणि आशिर्वाद यामुळे अकोलेकरांना नाहक त्रास सहन करत जगावे लागत आहे. अकोला हे एज्युकेशन हब असताना मेडिकल हब देखील आहे. मेडिकल हब




असलेल्या शहरात ॲम्बुलन्स चालकांची लुट आणि अरेरावी ही अकोल्याचे नाव बदनाम करत आहे.

## परवानगी नसताना लाल दिव्याचा गैरवापर

अकोल्याच्या रस्त्यांवर पेशंट नसतानाही ॲम्बुलन्सचे सायरन वाजवून आणि लाल दिव्याचा वापर करून सुसाट वेगाने गाड्या चालवल्या जात आहेत. या हुल्लडबाजीमुळे रस्त्यावरील सामान्य जनता त्रस्त झाली आहे. 'पेशंट नसताना या ॲम्बुलन्सना लाल दिवा वापरण्याची परवानगी कोणी दिली?' असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. ॲम्बुलन्स चालकांच्या या बेजबाबदारपणामुळे अपघाताची टांगती तलवार कायम असते. मुळात लाल दिव्याची परवानगी ॲम्बुलन्स चालकांना नाही. तरी सर्रास लाल दिव्याची ॲम्बुलन्स शहरात धावत असताना पोलिस प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना हे दिसत नाही काय असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## मोठ्या रुग्णालयांची 'कट प्रॅक्टिस' आणि बडे नेते

या ॲम्बुलन्स उद्योगाच्या मागे काही 'बड्या नेत्यांचे' वरदहस्त असल्याची चर्चा शहरात जोरात आहे. बड्या खासगी रुग्णालयांच्या नावाखाली हा काळा बाजार सुरू असून, यात 'कट प्रॅक्टिस'चे जाळे पसरलेले आहे. रुग्ण नेण्यापासून ते दाखल करेपर्यंत कमिशनचे गणित मांडले जाते, ज्याचा थेट फटका सामान्य माणसाच्या खिशाला बसत आहे.

## प्रशासनाकडून कारवाईची अपेक्षा

रस्त्यावर दहशत पसरवणारे चालक आणि रुग्णांची पिळवणूक करणारे मालक यांच्यावर अंकुश कोणाचा ? आरटीओ आणि वाहतूक पोलीस केवळ बघ्याची भूमिका घेणार की या ॲम्बुलन्स माफियांच्या मुसक्या आवळणार? असा सवाल आता अकोल्यातील नागरिक विचारत आहेत. जर लवकरच दरपत्रक जाहीर झाले नाही आणि या 'अवैध' दहशतीला लगाम बसला नाही, तर जनआक्रोश निर्माण होण्याची शक्यता आहे.

## ॲम्बुलन्सचे दरांचे पत्रक कुठे ? लुटीचा महापूर !

शहरातल्या शहरात पेशंटला नेण्यासाठी या ॲम्बुलन्स चालक रुग्णांच्या नातेवाईकांकडून हजारो रुपये उकळत आहेत. विशेष म्हणजे, आरटीओने अद्याप ॲम्बुलन्स सेवांचे अधिकृत दरपत्रक का प्रकाशित केले नाही ?. नियमावलीच्या अभावामुळे अगतिक रुग्णांची आणि त्यांच्या नातेवाईकांची सर्रास लूट सुरू आहे. या आर्थिक लुटीला जबाबदार कोण ?. या लुटीची किती रक्कम यंत्रणेला मिळते असा ही प्रश्न या निमित्त उपस्थित होत आहे.

# राष्ट्रीय स्पर्धेसाठी अकोल्याच्या 10 बॉक्सरांची निवड

**अकोला :** स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडिया द्वारा ५ ते ९ फेब्रुवारी २०२६ दरम्यान ग्रेट बंगळुरू (कर्नाटक) येथे होणाऱ्या १९ वर्षीय शालेय राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी अकोला क्रीडा प्रबोधिनी व जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्राचे १० बॉक्सर निवडण्यात आले आहेत. यामध्ये ४९ ते ८१ किलो गटात मुलांमध्य विवेक तायडे, रवींद्र पाडवी, चेतन अंभोरे, रिझवान शाह, रेहान हुसैन, ऋषीकेश चव्हाण यांची, तर ४५ ते ८१ किलो वजन गटात समीक्षा सोळंके, श्रद्धा प्रा. खोब्रागडे, भक्ती चुंगडे, वेदश्री गोतमारे, आदी खेळाडूंची निवड झाली आहे. सर्व खेळाडू सातारा येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धा पूर्व प्रशिक्षण शिबिराचे सहभागी होणार आहेत. स्पर्धेत क्रीडा प्रशिक्षक गजानन कबीर काम पाहत असून, सर्व खेळाडूंना जिल्हा क्रीडा अधिकारी व आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग कोच सतीशचंद्र भट मार्गदर्शन मिळत आहे.

**सातारा येथील स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबिरात होणार सहभागी**

# राज्यातील 8 महापालिकांत आज महापौरांची निवड !

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**नागपूर :** राज्यातील महापालिका निवडणुका नुकत्याच पार पडल्या. या निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर आता सर्वत्र महापौर आणि उपमहापौर पदासाठीची चुरस रंगणार आहे. राज्यातील महापालिका निवडणुकीनंतर आजचा राजकीय पटलावरचा अत्यंत महत्त्वाचा दिवस उजाडला आहे. जळगाव, धुळे, कोल्हापूर, पिंपरी-चिंचवड, नागपूर, अमरावती, सोलापूर आणि नाशिक या ८ महत्त्वाच्या महानगरपालिकांमध्ये आज महापौर आणि उपमहापौर पदासाठी निवड प्रक्रिया पार पडत आहे. सकाळी ११ वाजल्यापासून विशेष सर्वसाधारण सभांना सुरुवात होणार आहे.

राज्याची उपराजधानी असलेल्या नागपुरात महापौरपसाठी 'ठाकरे' विरुद्ध 'ठाकरे' असा सामना रंगताना दिसत आहे. त्यामुळे ही लढाई प्रतिष्ठेची बनली आहे. भाजपने कुणबी कार्ड खेळत निता ठाकरे यांना रिंगणात उतरवले आहे, तर काँग्रेसने स्नेहल ठाकरे यांच्या माध्यमातून तगडे आव्हान दिले आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपने स्पष्ट बहुमत मिळवले असून महापौरपदासाठी रवी लांडगे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची निवड बिनविरोध झाली आहे. मात्र, उपमहापौरपदासाठी महायुतीतच बिघाडी पाहायला मिळत आहे. भाजपच्या शर्मिला बाबर यांच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) च्या वैशाली काळभोर यांनी अर्ज दाखल केल्याने येथे मतदान रंगणार आहे. नाशिक महापालिका निवडणुकीत भाजपच्या हिमगौरी आडके यांच्यासमोर शिवसेना (ठाकरे गट) च्या सीमा पवार यांनी आव्हान उभे केले आहे. सोलापुरात मित्रपक्षांमध्येच सामना पाहायला मिळत आहे. महापौरपदासाठी भाजपचे विनायक कोंडीयाल आणि शिवसेना (शिंदे गट) चे प्रियदर्शन साठे आमनेसामने आहेत. अमरावतीत महापौरपदासाठी भाजपचे श्रीचंद तेजवाणी आणि काँग्रेसचे संजय शिरभाते यांच्यात थेट लढत आहे. उपमहापौरपदासाठी मात्र युवा स्वाभिमानचे सचिन भेंडे, काँग्रेसच्या लुबना तनवीर आणि बसपाचे सचिन वैद्य यांच्यात त्रिकोणी संघर्ष पाहायला मिळत आहे.

# जिल्ह्यात बारावीचे 26 हजार 287 विद्यार्थी देणार परीक्षा

**१० फेब्रुवारीपासून प्रारंभ, जिल्हाधिकाऱ्यांनी दिले निर्देश**

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**अकोला :** जिल्ह्यातील बारावीच्या परीक्षांना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वेळापत्रकानुसार १० फेब्रुवारीपासून सुरूवात होत आहे. या परीक्षेसाठी जिल्ह्यातून २६ हजार २८७ विद्यार्थी प्रविष्ट झाले आहेत. शिक्षण विभागामार्फत या परीक्षेची तयारी पूर्ण झाली आहे.

जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या आदेशानुसार, परीक्षा पूर्णतः कॉपीमुक्त वातावरणात पार पडाव्यात, यासाठी शिक्षण विभाग, पोलिस प्रशासन आणि संबंधित यंत्रणांनी सर्व खबरदारी घ्यावी, असे निर्देश जिल्हास्तरीय दक्षता समितीच्या बुधवारी झालेल्या बैठकीत देण्यात आले.

यावर्षी राज्य शासनाने दहावी व बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त ठेवण्यासाठी विशेष उपाययोजना केल्या आहेत. प्रत्येक परीक्षा केंद्रातील वर्गखोलीत सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे बंधनकारक राहाणार आहे. ज्या केंद्रांवर सीसीटीव्ही नसतील, तिथे शिक्षकांची अदलाबदल केली जाईल आणि संबंधित केंद्राची मान्यता रद्द करण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठवला जाईल, असे जिल्हाधिकारी वर्षा मीना, शिक्षणाधिकारी माध्यमिक डॉ. अरविंद मोहरे यांनी सांगितले. या बैठकीस जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे, शिक्षणाधिकारी योजना संजयकुमार झापे, डॉ. रत्नमाला खडके प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अकोला उपशिक्षणाधिकारी माध्यमिक प्रमोद टेकाडे, सुभाष भालेराव, उपशिक्षणाधिकारी प्राथमिक जितेंद्र प्रधान, विस्तार अधिकारी विनोद मानकर उपस्थित होते.

## दहावीचे २६ हजार ३५३ विद्यार्थ्यांसाठी ११८ केंद्र

- यावर्षी शिक्षण मंडळाने दिलेल्या वेळापत्रकानुसार दहावीची परीक्षा २० फेब्रुवारीपासून सुरू होणार असून, यासाठी ११८ परीक्षा केंद्र निश्चित केली आहेत. या परीक्षेला जिल्ह्यातून २६ हजार ३५३ विद्यार्थी प्रविष्ट झाले आहेत. ही परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात व्हावी, यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी बुधवारी बैठक घेत निर्देश दिले आहेत. तसेच उपाययोजनांबाबतचा आढावाही घेतला आहे.

## एका बाकावर केवळ एकच विद्यार्थी!

- परीक्षांच्या नियोजनबाबत विशेष खबरदारी घेण्यात येत असून, परीक्षा काळात वीज भारनियमन झाल्यास बॅटरी किंवा इन्व्हर्टरची पर्यायी व्यवस्था राखणे गरजेचे आहे. संवेदनशील व अतिसंवेदनशील परीक्षा केंद्रांवर व्हिडीओ चित्रीकरण, भरारी व बैठे पथक यांच्यामार्फततपासणी करण्यात येणार आहे. एका बाकावर एकच विद्यार्थी राहणार याबाबत विशेष खबरदारी घेण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. तसेच परीक्षार्थी कॉपी करताना आढळल्यास पोलिस गुन्हा दाखल केला जाईल.

# काँग्रेसचे गटनेता म्हणून डॉ. जिशान हुसेन यांच्या नावावर शिक्कामोर्तब !

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**अकोला :** महापालिकेतील सत्तासमीकरणांमध्ये मोठा राजकीय बदल घडवणारी महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. काँग्रेस पक्षाच्या गटनेता निवडीसंदर्भात प्रदेश काँग्रेस अध्यक्षांनी अमरावती विभागीय आयुक्तांना अधिकृत पत्र पाठवून पक्षाचे नगरसेवक नेते डॉ. जिशान हुसैन यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे. या पत्रामुळे अमरावती विभागीय आयुक्तांकडून काँग्रेसच्या गटाची अधिकृत नोंदणी होणार आहे. अमरावती विभागीय आयुक्तांकडून नोंदणी होताच

**♦ विभागीय आयुक्तांकडे निवडीचे पत्र**



महापालिकेतील काँग्रेस गटनेते पदावर डॉ. जिशान हुसेन यांच्या नावावर अधिकृत मोहोर उमटणार आहे. गेल्या काही दिवसांपासून काँग्रेस गटनेतेपदासाठी सुरू असलेल्या चर्चा आणि शक्यतांवर अखेर पडदा पडला आहे. प्रदेशाध्यक्षांनी थेट पुढाकार घेत स्पष्ट निर्णय घेतल्याने काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. डॉ. जिशान हुसेन यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस महापालिकेत विकासाच्या मुद्यांवर सत्ताधाऱ्यांना जाब विचारणार, तसेच नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडणार, असा विश्वास काँग्रेस कार्यकर्त्यांकडून व्यक्त केला जात आहे. एकूणच, काँग्रेस गटनेतेपदाच्या या निर्णयामुळे महापालिकेच्या राजकारणात नव्या पर्वाला सुरूवात होणार आहे. विशेष म्हणजे सध्याच्या महापालिकेत काँग्रेस पक्ष संख्याबळाच्या दृष्टीने क्रमांक दोनचा पक्ष आहे. त्यामुळे नियमानुसार विरोधी पक्षनेतेपदाचा मानही काँग्रेसलाच मिळणार असून, हे पदही नगरसेवक डॉ. जिशान हुसेन यांच्याकडे जाण्याची प्रबळ शक्यता आहे.

# अमरावतीच्या महापौरपदी भाजपचे श्रीचंद तेजवानी

**♦ युवा स्वाभिमानीचे सचिन भेंडे उपमहापौर**


प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**अमरावती:** अमरावतीच्या महापौरपदी भाजपचे श्रीचंद तेजवानी यांची निवड झाली. सिंधी समाजातील ते पहिले महापौर ठरले. तर उपमहापौर पदी युवा स्वाभिमानीचे सचिन भेंडे यांची निवड झाली. दोघांना प्रत्येकी ५५ मते मिळाली. तर १३ सदस्य तटस्थ राहिले. या दोघांना एमआयएमच्या सदस्य मीरा कांबळे यांनी मतदान केले हे विशेष. काँग्रेसच्या उमेदवारांचा पराभव झाला. महापौर उपमहापौर पदासाठी शुक्रवारी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. अमरावती महापालिकेत एमआयएमचे १२ नगर सेवक आहेत. त्यापैकी एका सदस्याने भारतीय जनता पक्ष तसेच युवा स्वाभिमानीच्या उमेदवारांना मतदान केले. हात उंचावून मतदान झाले.





# रुबल नागी यांना ग्लोबल टीचर प्राईज






**जागतिक स्तरावरील सर्वोच्च सन्मान**

वृत्तसंस्था ६ फेब्रुवारी

**दुबई:** शिक्षणाच्या क्षेत्रातील 'नोबेल' समजला जाणारा अत्यंत प्रतिष्ठेचा 'ग्लोबल टीचर प्राईज २०२६' (पुरस्कार यंदा भारताच्या रुबल नागी यांनी पटकावला आहे. दुबई येथे आयोजित 'वर्ल्ड गव्हर्नमेंट समिट'मध्ये एका दिमाखदार सोहळ्यात त्यांना १० लाख डॉलर्सचा (अंदाजे ८ कोटींहून अधिक रुपये) हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. दुबईचे क्राऊन प्रिन्स शेख हमदान बिन मोहम्मद बिन रशीद अल मक्तूम यांच्या हस्ते रुबल नागी यांना हा पुरस्कार सुपूर्द करण्यात आला. यावेळी जगभरातील दिग्गज शिक्षणतज्ज्ञ आणि सरकारी प्रतिनिधी उपस्थित होते.

रुबल नागी यांनी केवळ चार भिंतींतील शिक्षण न देता, झोपडपट्टी आणि ग्रामीण भागातील मुलांच्या आयुष्यात कलेच्या माध्यमातून प्रकाश निर्माण केला आहे. त्यांच्या 'रुबल नागी आर्ट फाउंडेशन' मार्फत त्यांनी राबवलेली 'मिसाईल क्रांती' ही मोहीम विशेष गाजली. यामध्ये त्यांनी हजारो घरांना रंग देऊन आणि मुलांना चित्रकलेच्या माध्यमातून शिक्षणाच्या प्रवाहात आणून सामाजिक बदल घडवला.

हा विजय भारतीय शिक्षण पद्धती आणि सामाजिक कार्याला जागतिक ओळख मिळवून देणारा ठरला आहे. 'शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान नाही, तर ते आत्मसन्मानाने जगण्याचे साधन आहे. हा पुरस्कार माझ्या एकटीचा नसून, ज्या मुलांसाठी मी काम करते, त्या प्रत्येकाचा आहे,' अशा शब्दांत रुबल नागी यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

# 'तुमची लायकी नाही' म्हणत विद्यार्थ्यांचा अपमान

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**अकोला :** शिक्षण पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अकोल्यातील कोचिंग इंडस्ट्रीला आता 'बोगस' क्लासमालकांच्या मनमानीचे ग्रहण लागले आहे. 'तुमची लायकी नाही' असे म्हणत विद्यार्थ्यांचे मनोबल खच्ची करणाऱ्या कोचिंग चालकांनी आता थेट पालकांच्या खिशावर दरोडा टाकण्यास सुरुवात केली आहे. अपूर्ण सिलॅबस आणि शिक्षकांची पळवापळवी यामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला लागले आहे.

अकोल्यात एका नामांकित कोचिंग क्लासमध्ये 'वडिलांची पुण्याई' वापरून दोघांमुलांद्वारे गाद्या चालवल्या जात आहेत, मात्र त्यांच्या पोरांच्या उद्योगांमुळे या संस्थांची बदनामी होत आहे. जेईई मध्ये आमचे विद्यार्थी कसे यशस्वी झाले याची बॅनरबाजी करत ॲडमिशन घेणाऱ्या या संस्थेत जेईई सारख्या महत्त्वाची परीक्षा गेल्या महिन्यात झाली असताना संस्थेचा सिलॅबस पूर्ण झालेला नव्हता. जेव्हा विद्यार्थी विचारणा करतात, तेव्हा त्यांना चक्क 'तुमची लायकी नाही' असे सुनावले जाते किंवा गपचूप 'सीईटी द्या' असा मोफत सल्ला देऊन बोळवण केली जाते. अकोल्यातील या शैक्षणिक बाजारपेठेला वेळीच लगाम बसला नाही, तर विद्यार्थ्यांच्या आत्महत्येला आणि पालकांच्या उद्धवस्त होणाऱ्या संसाराला हे 'कोचिंग माफिया'च जबाबदार असतील.

**कोचिंग संचालकांचे नसते उद्योग पालकांच्या कष्टाच्या पैशावर मात्र डल्ला**



## पालकांनो, वाचवा आपल्या पाल्याचे भविष्य

बाहेरगावहून अकोल्यात येणाऱ्या पालकांसाठी हा धोक्याचा इशारा आहे. ॲडमिशन घेण्यापुर्वी संस्थेच्या फसव्या जाहिरातींवर विश्वास ठेऊ नका. त्या क्लासच्या जुन्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती घ्या. कोचिंग क्लास च्या यशाचे मापदंड निश्चित करा. शिक्षक वारंवार बदलले जातात का, याची खात्री करा. सिलॅबस पूर्ण करण्याची हमी मागा.

## चकाचक बिल्डिंग आणि बॅनरबाजी

कोचिंग क्लासच्या आलिशान एसी इमारती, मोठ्या बिल्डिंग आणि रस्त्यारस्त्यावर लागलेली बॅनरबाजी ही केवळ पालकांना आकर्षित करून लुटण्यासाठी रचलेला सापळा आहे. केवळ २-४ यशस्वी विद्यार्थ्यांचे फोटो पाहून भुलू नका, अन्यथा तुमची लूट आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक आणि करिअरचे नुकसान अटळ आहे. अनेक क्लासेसमध्ये वारंवार शिक्षक बदलले जातात, अशा संस्थांपासून पालकांनी सावध राहणे गरजेचे आहे.

## पैसे परत मिळण्याचे धोरण नाही;संघटनांची 'अर्थपूर्ण' चुप्पी !

पालक लाखो रुपये फी एकाच वेळी भरतात, मात्र दोन महिन्यांतच कोचिंग क्लास मधील शिक्षणाचा दर्जा पाहून विद्यार्थी क्लास सोडण्याची भाषा करतात. अशा वेळी भरलेली फी परत मिळवण्याचे कोणतेही धोरण या क्लासेसकडे नाही. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी लढणाऱ्या विद्यार्थी संघटनांचे नेते या विषयावर 'अर्थपूर्ण' शांतता बाळगून आहेत. या नेत्यांना क्लासमालकांकडून मोठी रसद नाही तर थेट हप्ता पुरवली जात असल्याची ओरड आता पालकांमधून होत आहे.



सिटी न्यूज अमरावती

शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


## सोमठाणा खुर्द येथील पुनर्वसित ग्रामस्थांना घरमूल्यांकनाचा मोबदला मिळणार

**अमरावती :** मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत २०१३-१४ मध्ये पुनर्वसन झालेल्या आकोट वन्यजीव विभागातील मौजे सोमठाणा खुर्द येथील ११२ घरमूल्यांकन धारकांना नवीन भूसंपादन कायद्यानुसार मोबदला अदा करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या लाभार्थ्यांना घरमूल्यांकनाची दोन पट रक्कम देय असून, आवश्यक निधी उपलब्ध झाला असल्याची माहिती आकोट वन्यजीव विभाग, मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे उपवनसंरक्षक राहुल सिंह टोलिया यांनी दिली आहे. मोबदला मिळविण्यासाठी लाभार्थ्यांनी पुढील कागदपत्रे आकोट वन्यजीव विभाग कार्यालयात सादर करावीत. यामध्ये १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर अर्ज, सुरू असलेल्या बँक खाते पुस्तकाची छायाप्रत, आधारकार्डची छायाप्रत, नमुना ८ ची छायाप्रत (मूळ लाभार्थी मृत असल्यास वारस प्रमाणपत्र व वारसांच्या बँक खात्याची प्रत) ही कागदपत्रे आवश्यक आहेत. लाभार्थ्यांची सविस्तर यादी www.mahaforest.goved.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## अमरावतीमध्ये ब्रह्मा कुमारींच्या डिजिटल वेलनेस आणि HAPPI कार्यक्रमाचे उद्घाटन

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**अमरावती:** आजच्या डिजिटल युगातील आव्हाने लक्षात घेऊन, मुले आणि पालकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी पालक आणि मुलांसाठी डिजिटल वेलनेस - विशेषतः मोबाईल वापर या विषयावर एक भव्य जागरूकता परिषद आयोजित करण्यात आली होती. यानिमित्ताने HAPPI सकारात्मक पालकत्व उपक्रमासाठी समग्र दृष्टिकोन आणि डिजिटल वेलनेस कार्यक्रमाचे राष्ट्रीय उद्घाटन देखील करण्यात आले.

हा कार्यक्रम ४ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५:३० ते ७:३० या वेळेत अमरावती येथील हॉटेल मेहफिल इन येथील कॉन्फरन्स हॉलमध्ये प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विद्यापीठ, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.

◆ ब्रह्मकुमारींच्या डिजिटल वेलनेस कार्यक्रम




कार्यक्रमाची सुरुवात बीके अमोल भाई जी यांनी सादर केलेल्या भारत फिर भरपूर बनेगा या प्रेरणादायी गाण्याने झाली, ज्याने संपूर्ण वातावरण आध्यात्मिक ऊर्जा आणि सकारात्मकतेने भरले.

यानंतर, कार्यक्रमाची ओळख अमरावती जिल्हा संचालक बी.के. सीता दीदी यांनी करून दिली.

बी.के. प्रमोद भाई यांनी प्रमुख वक्ते आदरणीय डॉ. सचिन परब मुंबई यांची सर्व उपस्थितांना ओळख करून दिली.

कार्यक्रमाचे प्रभावी संचालन बी.के. सुहिता दीदी यांनी केले.

प्रमुख पाहुणे आणि सन्माननीय पाहुणे होते डॉ. मिलिंद बरहाते कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ . खोचे सह-धर्मादाय आयुक्त डॉ. विनायक देशपांडे कुलगुरू, जी.एच. रायसोनी विद्यापीठ, राजेश इंगोले सहायक धर्मादाय आयुक्त गुल्हाणे उप-धर्मादाय आयुक्त, शिक्षण विभाग, अमरावती, बामनोटे राम मेघे अभियांत्रिकी महाविद्यालय डॉ. ए.टी. देशमुख डीन, पंजाबराव देशमुख मेमोरियल मेडिकल कॉलेज डॉ सुधा जैन डीन, गोडे मेडिकल कॉलेज श्री आदर्श रेड्डी CF& FD, MTR प्रसिद्ध समाजसेवक श्री.लप्पीभैय्या जाजोदिया, हॉटेल मेहफिल इन चे संचालक श्री.गोपाल मुंदडा आणि बीके सीता दीदी विशेष उपस्थित होत्या. याव्यतिरिक्त, कार्यक्रमातील विशेष अतिथींचा समावेश आहे:

प्रा. स्मिता देशमुख विमलाबाई देशमुख महाविद्यालय सौ स्मिता तिखिले खारकर विद्यालय डॉ.दीपक धोटे ब्रिजलाल बियाणी महाविद्यालय श्री नितीन कोळी पोतदार इंटरनॅशनल स्कूल श्री.हेमाद्री देसाई (दिल्ली पब्लिक स्कूल श्रीमती रोमा कौर सहानी (प्राचार्या, सॅनफोर्ट ग्रुप ऑफ स्कूल्स श्री. संजय खडसे (प्राचार्या, राजश्री शाहू सायन्स कॉलेज श्री. शिरीष नवले (संचालक, वात्सल्य कॉलेज ऑफ नर्सिंग डॉ. राजेंद्र टेंभे आणि डॉ. किरण हातगावकर (आरोग्यम हॉस्पिटल आणि श्रीमती आदर्श रेड्डी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. सचिन परब (मुंबई, एक प्रेरक वक्ता, जीवन प्रशिक्षक, लेखक, कॉर्पोरेट प्रशिक्षक आणि राजयोग ध्यान मार्गदर्शक होते. त्यांच्या प्रभावी भाषणात ते म्हणाले, मोबाइल फोन स्वतः वाईट नाहीत; जेव्हा आपण मालकांऐवजी त्यांचे गुलाम बनतो तेव्हा समस्या उद्भवते. डॉ. परब यांनी स्पष्ट केले की आजची पिढी डिजिटल ड्रग्जच्या प्रभावाखाली आहे, जिथे नेटफ्लिक्स, यूट्यूब, इंस्टाग्राम आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील अनियंत्रित सामग्रीचा वापर मुलांच्या एकाग्रता, स्मरणशक्ती आणि भावनिक संतुलनावर परिणाम करत आहे. त्यांनी उदाहरण दिले की गोल्डफिश १२ सेकंदांसाठी लक्ष केंद्रित करू शकते, परंतु आजच्या मुलांचे लक्ष वेधण्याची क्षमता आणखी कमी होत आहे.

## लाडकी बहीण योजना: पात्र महिलांच्या अर्जातील त्रुटी सुधारण्याची संधी

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**अमरावती:** महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी आणि त्यांच्या आरोग्य व पोषणात सुधारणा करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या अंमलबजावणीत काही तांत्रिक अडचणी समोर आल्या आहेत. ज्या पात्र महिलांनी ई-केवायसी किंवा आधार प्रमाणीकरण करताना चुकीचा पर्याय निवडला आहे, अशा महिलांचे लाभ सध्या तांत्रिक कारणास्तव बंद झाले आहेत. या त्रुटी सुधारण्यासाठी पात्र महिलांनी त्वरित आपल्या संबंधित अंगणवाडी सेविकेशी संपर्क साधून दुरुस्ती प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अतुल भडांगे यांनी केले आहे.

या योजनेची प्रक्रिया पूर्ण करताना लाभार्थी महिलांकडून तांत्रिक चुका झाल्याचे निदर्शनास आले असून, ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देऊनही अनेक अर्ज प्रलंबित आहेत. योजनेच्या नियमानुसार लाभार्थ्यांचे वय २१ ते ६५ वर्षांच्या दरम्यान असावे आणि ती महिला असावी. तसेच, कुटुंबातील कोणताही सदस्य सरकारी कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी किंवा निवृत्तीवेतनधारक नसावा. मात्र, अर्ज भरताना किंवा ई-केवायसी करताना अनावधानाने चुकीची माहिती भरली गेल्यामुळे अनेक पात्र महिला या लाभापासून वंचित राहिल्या आहेत. अशा महिलांची यादी आता प्रत्यक्ष पडताळणीसाठी बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी व ग्रामीण) यांच्याकडे पाठविण्यात आली आहे.

ज्या महिलांचा लाभ तांत्रिक कारणास्तव थांबला आहे, त्यांनी आपल्या अंगणवाडी सेविकेकडे स्वयंघोषणा पत्र भरून द्यावे. अंगणवाडी सेविका या अर्जांची यादी तयार करून ती बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांकडे सादर करतील, जेणेकरून अर्जातील चुका दुरुस्त होऊन लाभ पुन्हा सुरू होईल. अधिक माहितीसाठी महिलांनी थेट बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयाला भेट द्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## इयत्ता १० वी व १२ वीच्या परीक्षेसाठी 'कॉपीमुक्त' अभियानावर भर; प्रशासन सज्ज

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**अमरावती :** जिल्ह्यात आगामी १० वी आणि १२ वीच्या बोर्ड परीक्षा अत्यंत शिस्तबद्ध, पारदर्शक आणि भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली. सन २०२५-२६ शैक्षणिक वर्षातील १२ वीची परीक्षा १० फेब्रुवारीपासून तर १० वीची परीक्षा २० फेब्रुवारीपासून सुरू होत आहे. परीक्षेच्या काळात कॉपीचे प्रकार रोखण्यासाठी आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी विशेष दक्षता समितीची स्थापना करण्यात आली असून तिची पहिली बैठक संपन्न झाली आहे.

यावर्षी अमरावती जिल्ह्यातून १० वीसाठी १८७ केंद्रांवर २८ हजार ५३१ विद्यार्थी, तर १२ वीसाठी १३७ केंद्रांवर ३९ हजार ९३४ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. जिल्हयातील एकूण केंद्रांपैकी ८५ टक्के केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर राहणार आहे. विशेषतः जिल्ह्यातील ३४ उपद्रवी आणि ४३ संवेदनक्षम केंद्रांवर प्रशासनाने विशेष लक्ष केंद्रित केले असून, तिथे केंद्रप्रमुख आणि पर्यवेक्षकांची अदलाबदल करण्याचे आदेश राज्य मंडळाने दिले आहेत.

यासंदर्भात जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी विविध विभागांना सूचना दिल्या आहेत. परीक्षा काळात खंडित वीज पुरवठ्याची समस्या उद्भवू नये यासाठी महावितरणला सतर्क राहण्यास सांगितले आहे. विद्यार्थ्यांना वेळेवर केंद्रावर पोहोचता यावे यासाठी परिवहन मंडळाने जादा बसचे नियोजन करण्याचे निर्देश दिले आहेत. प्रत्येक परीक्षा केंद्रावर पोलिसांचा चोख बंदोबस्त असणार असून महसूल विभागाची विशेष भरारी पथकेही कार्यरत राहतील. पंचायत समिती स्तरावरील वर्ग-१ आणि वर्ग-२ च्या अधिकाऱ्यांची नियुक्ती या पथकांमध्ये केली जाणार आहे. परीक्षेचे गांभीर्य राखण्यासाठी केवळ प्रशासकीय तयारीच नाही, तर विद्यार्थी आणि पालकांमध्ये जनजागृती करण्यासाठी शपथ देखील देण्यात आली आहे. 'कॉपीमुक्त' आणि 'भयमुक्त' वातावरणात प्रत्येक विद्यार्थ्याला आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळावी, हाच या नियोजनाचा मुख्य उद्देश असल्याचे श्री. येरेकर यांनी सांगितले.

सर्व शिक्षक, संस्थाचालक आणि पालकांनी या परीक्षा यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे आणि विद्यार्थ्यांनी कोणत्याही दडपणाशिवाय अभ्यासावर लक्ष केंद्रित करून परीक्षेला सामोरे जावे, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी केले आहे.

## पत्रकारांसाठी आरोग्य शिबिर संपन्न

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

◆ पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने उपक्रम

**अमरावती:** धावपळीच्या जीवनशैलीत पत्रकारांचे स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होत असते. ही बाब लक्षात घेऊन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार, अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे अमरावतीतील पत्रकार, प्रसारमाध्यम कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी आज एका विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये २२६ पत्रकारांनी आरोग्य सुविधांचा लाभ घेतला.

पत्रकारिता हे अत्यंत आव्हानात्मक क्षेत्र आहे. सततची धावपळ, कामाच्या अनिश्चित वेळा



आणि मानसिक ताण यामुळे पत्रकारांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते. ही गरज ओळखून पालकमंत्र्यांच्या जनसंपर्क कार्यालयामार्फत या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांच्या चमूने उपस्थित राहून सर्वांची सखोल आरोग्य तपासणी केली. यामध्ये प्रामुख्याने रक्तातील चरबीचे प्रमाण तपासण्यासाठी संपूर्ण 'लिपिड टेस्ट', तसेच 'फुल बॉडी चेकअप' करण्यात आले. वाढत्या डिजिटल कामामुळे डोळ्यांवर येणारा ताण लक्षात घेऊन विशेष 'नेत्र तपासणी' आणि 'दंत चिकित्सा' शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते.

शिबिरात रूग्ण तपासणीसाठी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार, मुख्यमंत्री सहायता निधीचे डॉ. श्याम गावंडे, ससंसर्गजन्य रोग विभागाचे डॉ. प्रज्ञा कडू, वैभव झुकरे, पल्लवी बोरकर, श्रद्धा कडू, टीबी हॉस्पीटलचे नितीन बेदरकर, शुभांगी उमरकर, दंत महाविद्यालयाचे विभाग प्रमुख डॉ. अपूर्वा रोडे, डॉ. जान्हवी अंबाडकर, डॉ. पूजा शिंदे, डॉ. वेदश्री भडवे, डॉ. प्रितीका काळे, डॉ. अमिषा जुनघरे, डॉ. इशान पाटील, प्रमोद बकाडे, सुभाष दिघेकर, वैद्यकीय चमूतील डॉ.रूपाली ठाकरे, डॉ. प्रज्ञा चौधरी, डॉ. वैभव देशमुख, धीरज राऊत, संजीवनी सोनवणे, डॉ. नायब शेख आदी यांनी सहकार्य केले. शिबिरासाठी पालकमंत्री जनसंपर्क कार्यालयाचे शशांक चौरे यांनी पुढाकार घेतला.

## परीक्षा आली ..... आता फक्त अभ्यास


**विद्यार्थी मित्रांनो, तुम्हाला तुमचा एक विद्यार्थी म्हणून अभ्यासाशी काय संबंध आहे हे सांगण्याची मुळीच गरज नाही. विद्यार्थी म्हणून तुमचा आणि तुम्ही करत असलेल्या अभ्यासाची तुलना ही केवळ प्रत्येक व्यक्ती आणि ती घेत असलेल्या श्वासोच्छवास यांच्याशीच होऊ शकते. कोणत्याही व्यक्तीचे अस्तित्व श्वासोच्छवासाशिवाय शून्य आहे. अगदी तसेच कोणताही विद्यार्थ्याचे विद्यार्थी म्हणून अस्तित्व हे केवळ तो करीत असलेल्या अभ्यासामुळे आहे अन्यथा अभ्यासाशिवाय त्याचे अस्तित्व विद्यार्थी म्हणून शून्यच आहे.**

मित्रांनो, तुमच्या आयुष्यात विद्यार्थी म्हणून तुमचा जीवनकाळ अनेकानेक उत्साह देणाऱ्या घटनांनी भरलेला असतो. या सर्व घटनांचा आनंद घेताना अनेकवेळा अभ्यासाकडे दुर्लक्ष होते. मी भेटलेल्या अनेक विद्यार्थ्यांना योग्य अभ्यासाची पद्धत माहित नव्हती आणि त्यामुळे त्यांचा अभ्यास होत नव्हता. या सर्व समस्यांवर तोड म्हणून आज आपण अभ्यास करण्याच्या योग्य प्रकारांची माहिती करून घेऊ. या मध्ये त्या सर्व कौशल्यांची सुद्धा माहिती करून घेऊ ज्यामुळे आपल्या अभ्यास करण्याच्या गतीमध्ये सकारात्मक फरक पडेल. चला तर मग आता आपण आपला अभ्यासाविषयी विस्ताराने जाऊन घेऊ.

**१) अभ्यास करण्यासाठीची मनस्थिती :-** तुम्ही अभ्यास करतांना तुमची मनस्थितीचा विचार न करता केवळ आई-वडील म्हणतात किंवा अभ्यासाची वेळ झाली किंवा उद्या एखाद्या विषयाचा पेपर म्हणून जर अभ्यास करत असाल तर तुम्ही खूप मोठी चूक करत आहात. अभ्यासवर एकाग्रचित्त होण्यासाठी तुमची मनस्थिती शांत असणे आवश्यक आहे. तुमचे कोणाशी भांडण झाले असेल, तुम्हाला खूपच इंटरेस्ट आहे असा एखादा सामना सुरु असेल, बाहेर तुमचे मित्र वेगळ्या विषयावर गप्पा मारत असतील किंवा घरामध्ये काही टेन्शन असेल तर अशावेळी अभ्यासाला बसणे याला काहीही अर्थ नाही. मनामध्ये दुसरे विचार चालू असताना तुम्ही अभ्यासामध्ये आपले मन लावण्याचा प्रयत्न करणे सर्वस्वी चुकीचे आहे. जेंव्हा-जेंव्हा तुम्ही अभ्यासाला बसाल तेंव्हा ईतर कोणत्याही प्रकारचे ताण-तणाव नसतील याची खात्री करून घ्या आणि नंतरच अभ्यास सुरु करा. अशाप्रकारे केला जाणारा अभ्यास हा नेहमीच फलदायी असतो.

**२) सकारात्मक विचारांचा प्रभाव :-** अभ्यासाला बसताना स्वतःविषयी नेहमीच सकारात्मक विचार करायला शिका. तुमच्यामध्ये ज्या-ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्यांचा विचार करा आणि आता तुम्ही त्यांचा उपयोग करून कसा वेगात अभ्यास करणार आहात याचा विचार करा. 'माझ काम एकदम कठीण आहे. मला या परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी कधी आणि कसा वेळ मिळेल हे देवालाच माहित असा विचार करून अभ्यासाला बसाल तर तुमचे काम खरोखर कठीण होऊन जाईल. त्या पेक्षा मला अभ्यासाला थोडा उशीर झाला हे खरे पण माझा माझ्या बुद्धिमत्तेवर पूर्ण विश्वास आहे आणि मी हा अभ्यास वेळेवर पूर्ण करेल याची मला खात्री आहे असा विचार केला तर तुम्हाला धीरही येईल आणि तुम्ही अभ्यास पूर्ण करू शकाल. स्वतःची दुसऱ्याशी तुलना करणे सोडा. तुलना केल्याने दोन पैकी एका घटकासाठी नकारात्मक विचार निर्माण होतात आणि त्याने नेमके तुमचे नुकसान होऊ शकते. तुम्हाला तुमची बलस्थाने माहित असतात. त्यांचाच विचार करा आणि तुमचा अभ्यास कसा चांगल्याप्रकारे होईल हे निश्चित करा.

**३) अभ्यासाच्या स्थानाचे महत्व :-** जास्तीत-जास्त विद्यार्थी हे अश्याच ठिकाणी अभ्यास करतात कि जे ठिकाण अभ्यासासाठी योग्य नाही. ज्या ठिकाणी पदोपदी तुमचे लक्ष विचलित होते आहे त्याठिकाणी अभ्यास करण्यात काहीही अर्थ नाही. ज्या ठिकाणी येणाऱ्या-जाणाऱ्यांची वर्दळ सुरु आहे, किचन मधून खाद्य-पदार्थांचा वास येतो आहे, ऊन् सुरु आहे किंवा खिडकीतून तुमचे लक्ष वारं-वर बाहेर जात आहे अशा ठिकाणी अभ्यासाला बसणे सर्वस्वी चुकीचे आहे. शाळा-कॉलेज, लायब्ररी किंवा तुमचे घर यामधील शांत जागा पाहून त्यठिकाणी अभ्यास करणे नेहमीच योग्य. अभ्यासाला बसताना रात्रीच्या वेळी इलेक्ट्रिक बल्ब तुमच्या समोरच्या बाजूला असल्यास उत्तम, जेणेकरून तुमची सावली पुस्तकावर पडून तुम्हाला पाहायला किंवा वाचायला अडचण येणार नाही. तुमच्या डोळ्यांवर अकारण ताणही पडणार नाही आणि त्यामुळे अभ्यास करायला सहज शक्य होईल.



**४) सर्व साहित्याची वेळे आधीच जमवा-जमाव :-** अभ्यास करण्यासाठी तुमची तयारी म्हणजेच सर्वकाही नाही. ज्या विषयाचा अभ्यास करायचा आहे त्या विषयाची आवश्यक ती वह्या-पुस्तके, पेन, काढलेल्या नोटस, कॅल्कुलेटर, वर्क-बुक्स आदी सर्व साहित्य तुमच्या अभ्यास करायच्या जागेवर आधीच असतील तुमचा वेळतर वाचेलच आणि अनावश्यक चिडचिड होणार नाही. भूगोल सारख्या विषयासाठी आवश्यक ते नकाशे, आलेख पेपर, इंग्लिशच्या अभ्यासासाठी इंग्लिश शब्दसंग्रह अश्याप्रकारच्या साहित्याची गरज असतेच. हे सर्व साहित्य वेळेवर योग्य ठिकाणी मिळाल्यास अभ्यास करण्याच्या कार्यक्षमतेमध्ये निश्चितच वाढ होते. प्रत्येकवेळी धावपळ करत वेग-वेगळ्या आवश्यक वस्तूंची जमवा-जमाव करणे म्हणजे वेळेचा वेळ नसतानाचा केलेला अपव्यय नाही तर काय ?

**५) अभ्यास कि करमणूक ? :-** आज-काल विद्यार्थ्यांनी स्वतःच ठरवण्याची वेळ आली आहे कि त्यांच्यासाठी योग्य काय आहे आणि काय नाही. परीक्षा तोंडावर आल्या आहेत आणि अजूनही जर तुम्हाला टीवी, मोबाईल, फेस-बुक आणि वेगवेगल्या साईट पहायचा मोह आवरत नसेल तर, नंतर येणाऱ्या निकालाच्या वेळी मात्र स्वतःलाच दोष द्यायला विसरू नका. विद्यार्थी मित्रानो, एक बाब पक्की लक्षात घ्या कि सगळीच दृक-श्राव्य माध्यमे (audio visual) म्हणजे टीवी, मोबाईल, फेस-बुक, सिनेमे, whats-apped ner जरी तुमच्या मते तुम्ही कमी वेळासाठी पाहत असाल तरी तुमच्या मेंदूवर खूप-जास्त वेळेपर्यंत आपला प्रभाव टाकतात. तुम्हाला जरी वाटत असेल कि मी तर टीवी फक्त अर्धाच तास पाहतो, मोबईल गेम्स थोडा वेळ तर खेळतो, रात्री झोपताना थोडा वेळ फेस-बुक पाहिले तर काय झाले, पण या सगळ्या थोडा-थोडा वेळ दिलेली मनोरंजनाची साधने तुमच डोक व्यापून टाकतात. तुम्ही अभ्यासाला बसले कि तुमच्या डोक्यात बरोबर त्याच वेळी तुम्ही ह्या साधनांचा उपयोग करून जे-जे पाहिले किंवा ऐकले आहे त्या सर्व बाबी एक-एक करून येत राहतात. मग खरं पाहिले तर कशाचा अभ्यास करता तुम्ही ? अभ्यासही होत नाही आणि विचारांची अवनती होते ती वेगळी. त्यामुळे आत्ताच आणि इथेच ठरवा आणि टीवी, मोबाईल, फेस-बुक, सिनेमे, whats-app ला परीक्षा संपेपर्यंत निरोप द्या. अहो परीक्षा संपल्यानंतर तुम्ही आणि तुमची मनोरंजनाची साधने --- काय हवे ते करा. पण आता मात्र फक्त अभ्यास.

**६) तुमच्या स्वतःच्या नोटस तयार करा :-** परीक्षा आली म्हणजे आपण पुस्तके, गाईड्स, नोटस यांची जमवा-जमव करतो आणि अभ्यास सुरु करतो. मित्रानो, तुम्ही एक बाब लक्षात ठेवा कि जे-जे तुम्ही वाचता ते तुम्हाला लक्षात राहावे असे वाटत असेल तर तुम्ही तुमच्या स्वतःच्या नोटस तयार करण्याची सवय लावून घ्या. स्वतःच्या नोटस तुम्ही तेंव्हाच तयार करू शकाल जेंव्हा तुम्ही स्वतः पुस्तके किंवा इतरांचा नोटस वाचाल. त्यानंतर तुम्ही तुमच्याच तयार केलेल्या नोटस वाचत जा. तुमच्या नोटस तुमच्या सोयीने तयार केलेल्या असल्याने त्यांचा वापर करून अभ्यास करणे नेहमीच तुमच्यासाठी सहज आणि सोपे होऊन हाते. याठिकाणी तुमच्यासाठी एक महत्वाचा मंत्र लक्षात ठेवा कि इतरांच्या तयार केलेल्या नोटस वरून केवळ घोकंपट्टी करता येते अभ्यास नाही.

**७) लक्षात ठेवण्यासाठी आगळ्या-वेगळ्या पद्धती :-** परीक्षा जवळ आल्या म्हणजे काय-काय लक्षात ठेवायचे आणि कसे लक्षात ठेवायचे हा यक्ष-प्रश्न तुम्हाला निश्चितच पडत असेल. अगदी सरळ विचार करायचा तर अगदी रोज ठराविक वेळ जर अभ्यास तुम्ही केला असेल तर तुम्हाला विशेष समस्या येणारच नाही. तुम्हाला माहित हवे कि नियमित अभ्यासाबरोबरच जर वाचलेल्या माहितिचे memoryed maps करून ठेवले तर तुम्ही त्यांचा उपयोग करून कमीत-कमी वेळात जास्तीत जास्त अभ्यासाची रिविजन करून शकाल. यामध्ये जे मुद्दे लक्षात ठेवायचे आहेत त्या मुद्द्यांचे पहिले शब्द घेऊन एखादे वाक्य तयार करायचे आणि नंतर केवळ ते वाक्य नेहमी-नेहमी लक्षात ठेवले कि सर्व मुद्दे आपोआपच लक्षात ठेवणे शक्य होते. या पद्धतीचा वापर करून तुम्ही मोठ-मोठे धडे (lesons) केवळ काही वाक्यांमध्येच लक्षात ठेऊ शकतात. या पद्धतीचा उपयोग करण्याची सवय जर सर्व विद्यार्थ्यांनी लावली तर परीक्षेच्या वेळी कमीत वेळात बराच मोठा अभ्यास करता येईल.

**८) एकटे किंवा ग्रुप —** निर्णय तुमचा :- मित्रानो, अभ्यास करताना तुम्हाला एकट्याला अभ्यास करायचा आहे कि ग्रुप मध्ये हे तुम्ही ठरवा. जर तुमच्यापाशी सोडवण्यासाठी टेस्ट-पेपर्स असतील आणि मार्गदर्शन करण्यसाठी शिक्षक असतील तर तुम्ही एकटे अभ्यास करणे योग्य असेल. ग्रुप मध्ये अभ्यास करायचे काही वेगळेच फायदे असतात. काही मित्र विशिष्ट विषयांमध्ये हुशार असतात. ते जर आपल्या ग्रुप मध्ये असतील तर त्यांच्या हुशारीचा तसेच त्यांच्या अभ्यास करायच्या पद्धतीचा आपण अवलंब केला तर आपल्याला खूप मोठा फायदा होऊ शकतो. तीन ते चार मित्रांच्या पेक्षा ग्रुपचा आकार मोठा नसावा. ग्रुपमध्ये अभ्यासाचा एक मोठा फायदा म्हणजे ग्रुपमधील मित्र एकमेकांची तोंडी परीक्षा (orals) घेऊन रिविजन व्यवस्थित झाली याची खात्री करून घेऊ शकतात. अर्थातच ग्रुपवर जर कोणाचे नियंत्रण नसेल किंवा ग्रुपमध्ये एखादा आळशी किंवा उडणटप्पू मित्र असेल तर मात्र पूर्ण ग्रुप अभ्यास करून शकणार नाही. तुम्ही एकटे अभ्यास करावा किंवा ग्रुपमध्ये हा निर्णय मात्र सर्वस्वी तुमचाच असेल.

**९) तुमचा टाईम-टेबल तयार झाला का ? :-** माझा तरी अधिकाधिक विद्यार्थ्यांच्या बाबतीत हा अनुभव आहे कि त्यांच्या मते अभ्यास ही नियमित नाही तर परीक्षेच्या थोड्या आधी करायची बाब आहे. सर्वच यशस्वी विद्यार्थ्यांचे मात्र याबाबतीत दुमत आहे. अभ्यास हा एका ठराविक वेळेत जर झाला असेल तर विद्यार्थ्यांवर कोणताच विशेष ताण न येता परीक्षेच्या वेळी शंभर टक्के तयारी झालेली असते. याबाबतीत तुम्हाला एक युक्ती सांगतो. जसे तुमचा शाळेत जाण्याची-येण्याची वेळ ठरलेली असते अगदी तशीच अभ्यासाची वेळ निश्चीत करा. शाळेत वेळेवर जाण्याचे जसे टेन्शन असते अगदी तसेच ठराविक वेळी अभ्यास करण्याचे टेन्शन यायला पाहिजे. सर्वच यशस्वी विद्यार्थी अभ्यासाचा टाईम-टेबल तयार करून अभ्यास करण्याच्या संकल्पनेला एकमताने दुजोरा देतात. तुम्ही सुद्धा तुमचे अभ्यासाचे वेळा-पत्रक तयार करून आता परीक्षेच्या काळात ते तंतोतंत पाळायचा प्रयत्न करा. अगदी रोज अभ्यास करण्याचा कंटाळा येणाऱ्या विद्यार्थ्यांना माझी सूचना आहे कि रोज अभ्यास न करता दर दुसरया दिवशी अभ्यासाचा टाईम-टेबल जरी तयार केला तरी तो अगदी परीक्षेच्या वेळी केलेल्या अभ्यासापेक्षा कितीतरी पट फायदेशीर असतो.

**१०)अभ्यासामध्ये 'ब्रेक' अतिशय महत्वाचा :-** बऱ्याचवेळा विद्यार्थ्यांना अभ्यास हे एक काम वाटत असल्याने ते अभ्यास करायचा कंटाळा करतात. एकाच वेळी चार तास अभ्यास करायचा असल्यास कोणालाही कंटाळा येईल. पण एक ते दीड तास अभ्यास झाल्यानंतर एक १० मिनिटांचा छोटा ब्रेक घेऊन त्यामध्ये एखादा समोसा, चहा किंवा तत्सम नाश्ता जर घेतला तर परत एकदा तरतरी येऊन दुप्पट जोमाने अभ्यास करता येईल. डोळ्यावर येणारी झोपही जाईल आणि एकाच ठिकाणी एकाच पद्धतीने बसल्यावर जो आळस येतो तो सुद्धा दूर करता येईल प्रत्येक वेळी अभ्यासाला बसल्यावर संपूर्ण लेसन एकाच वेळी तयार व्हायला पाहिजे असा विचार केला तर टेन्शन निर्माण होते. त्यापेक्षा लेसनचे विभाग करून ते जर छोटे-छोटे ब्रेक घेऊन केले तर लवकर लक्षात येईल. माणसाच्या मेंदूलाही जर असे ब्रेक मिळाले तर आपल्याला वेगात अभ्यास करता येईल.

**११) तुमच्या शारीरिक आणि मानसिक तब्येतीची काळजी घ्या :-** संपूर्ण वर्षभर अभ्यास करून जर परीक्षेच्या वेळीच तब्येत चांगली राहिली नाही तर होणारी हानी हि विद्यार्थ्याच्या दृष्टीकोनातून अपरिमित असते. जर वेळेवर एखादे आजारपण उद्भवले आणि त्यामुळे शेवटी अभ्यास करता आला नाही किंवा परीक्षाच देता आली नाही तर कधी न भरून येणार नाही असे नुकसान होते. त्यामुळे मित्रानो या काळात तुमच्या शरीराची काळजी घ्या. वेळेवर जेवण, व्यायाम, अभ्यास आणि झोप घेणे अत्यावश्यक आहे. परीक्षेच्या वेळी तुमचा अभ्यास चांगला झाला आहे त्यामुळे काळजी करायचे काहीच कारण नाही असेच सकारात्मक विचार ठेवा म्हणजे तुमची मानसिक प्रकृतीसुद्धा उत्तम राहील आणि तुम्ही आत्मविश्वासाने परीक्षा देवू शकाल.

विद्यार्थी मित्रांनो, आता हा फेब्रुवारी महिना सुरु झाला आहे. तुमच्यापाशी आता केवळ हाच एक महिना आहे कि ज्यामध्ये तुम्हाला तुमच्या संपूर्ण ताकदीनिशी प्रयत्न करायचे आहे. वर दिलेल्या वेग-वेगळ्या पद्धतींचा आणि तंत्रांचा उपयोग करा आणि मनापासून अभ्यास करा. तुमच्यासाठी हा महिना म्हणजे NOW OR NEVER अश्या स्वरूपाचा असल्याने या महिन्यामध्ये तुम्ही जेवढे जास्त प्रयत्न कराल तेवढ्याच मोठ्या प्रमाणात मिळणारे तुमचे यश असेल हि खात्री बाळगा.




नितीन बक्षी
अकोला,
९३७०२६०४९१

सिटी न्यूज अकोला

शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

**अकोला:** : आदिवासी विकास विभागातर्फे परदेशातील शैक्षणिक संस्थांत २०२६-२७ या वर्षात पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी व पीएडी अशा अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. त्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत. परदेशातील संबंधित शैक्षणिक संस्था जागतिक क्रमवारीत २०० च्या आत असावी. उमेदवार व उमेदवाराचे आई, वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावे. उमेदवाराच्या पालकांचे, कुटुंबाचे व उमेदवार नोकरी करत असल्यास त्याचे स्वतःचे उत्पन्न धरून सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील एकत्रित कौटुंबिक वार्षिक उत्पन्न आठ लाखापेक्षा जास्त नसावे. विहीत निकषांनुसार पात्र विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास उत्पन्न मर्यादा १० लाखापर्यंत, तसेच विद्यापीठाची जागतिक क्रमवारी ३०० पर्यंत शिथील केली जाईल.

## शिवणी येथे श्री गजानन महाराज प्रगट दिनानिमित्त भक्तीमय कार्यक्रमांची रेलचेल



**अकोला:** समर्थ सद्गुरु सेवा समिती शिवणी यांच्या वतीने संचालित श्री गजानन महाराज मंदिर, शिवणी येथे संत श्री गजानन महाराजांच्या प्रगट दिनानिमित्त दिनांक ५ ते ८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत विविध धार्मिक व भक्तीमय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या चार दिवसांत संपूर्ण शिवणी परिसर भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे.

या उत्सवाची सुरुवात गुरुवार, ५ फेब्रुवारी २०२६ रोजी झाली असून, यावेळी रुक्मिणी महिला भजन मंडळ, मलकापूर यांच्या भक्तीगीतांच्या कार्यक्रमाने वातावरण भक्तिमय झाले. श्रींच्या नामस्मरणाने भाविक मंत्रमुग्ध झाले होते. शुक्रवार, ६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजता शारदा महिला भजन मंडळ, प. दे. कृ. वि., अकोला यांच्या भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, या भजनसेवेतून भाविकांना नामस्मरणाचा लाभ मिळणार आहे. शनिवार, ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ८ वाजता श्री गजानन महाराजांच्या ग्रंथाचे सामूहिक पारायण होणार असून, रात्री ८ वाजता श्री संत मोतीराम बाबा भजन मंडळ, अकोला यांच्या भजनसेवेने भक्तिरसाची उधळण होणार आहे.

## भक्तांसाठी आरोग्य यंत्रणा आपल्या दारी मोहिम

**अकोला:** श्री सत्यसाईबाबा सेवा संघटना आणि निलेश देव मित्र मंडळ यांच्या वतीने गजानन महाराज प्रगट दिनानिमित्त वारकरी भक्तांसाठी आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

०७ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ ते रात्री ११ वाजेपर्यंत गोतमारे फार्म हाऊस येथे सेवा दिली जाईल. प्राथमिक उपचार, पायी वारी करणाऱ्या भक्तांना वैद्यकीय मदत दिली जाईल. या सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

## निधन वार्ता

### कमलाबाई बेलसरे



**अकोला:** येथील न्यू तापडिया नगरातील रहिवासी कमलाबाई भीमराव बेलसरे यांचे बुधवारी सायंकाळी निधन झाले. ॲड. नरेंद्र बेलसरे यांच्या त्या मातोश्री होत.

# व्यसनमुक्त भारतासाठी युवकांनी पुढाकार घेण्याची गरज – बबनराव कानकिरड

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**अकोला:** व्यसनमुक्ती समाजासमोरील मोठे आव्हान आहे. त्यासाठी तरुण पिढीने पुढाकार घेण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र नशाबंदी मंडळाचे जिल्हा संघटक व सर्वोदय मंडळाचे जिल्हाध्यक्ष बबनराव कानकिरड यांनी केले.

श्रीमती महेरबानू विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे भौरद येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबीरात 'नशामुक्त भारत' या विषयावर बोलत होते. उपप्राचार्य डॉ. मयुर मालविया, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. अनिल वानखडे, प्रा. रूपाली गोळे हातोलकर, प्रा. कुद्दूसा फारुकी, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष उल्हास सरदार, संतोष डोंगरदिवे उपस्थित होते.




अकोला गुजराती समाजाचे अध्यक्ष दीपक शहा व कार्यकारिणी सदस्य, प्राचार्य डॉ. स्मिता शिंगरूप, सरपंच शिल्पा सरदार यांचे मार्गदर्शननात श्रमदान, ग्राम स्वच्छता, वनराई बंधारा, व्यसन मुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन, बचत गट मार्गदर्शन, रांगोळी स्पर्धा आदि उपक्रम राबविले जात आहेत. डॉ. मयूर मालविया यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणिव, शिस्त व राष्ट्र प्रेमाची भावना निर्माण होते असे सांगितले.

कार्यक्रमाचे संचालन संस्कृती नागरनाईक यांनी केले. आभार प्रदर्शन कु. वैष्णवी ठाकरे यांनी केले. पंकज बागडे, भावेश वाघमारे, ठोकळ यांचेसह शालेय - महाविद्यालयीन विद्यार्थी, नशाबंदी मंडळ, सर्वोदय मंडळाचे कार्यकर्त्यां सह ग्रामस्थ मोठ्या संख्येत उपस्थित होते.

# सेंट पॉल पब्लिक स्कूलमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप



प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**अकोट:** सेंट पॉल पब्लिक स्कूलमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप देण्यात आला. या कार्यक्रमाकरिता संस्थेचे अध्यक्ष नवनीत लखोटिया, लूणकरण डागा, प्रमोद चांडक, शारदा लखोटिया, रेखा चांडक, शाळेचे प्रा. द्वारिका प्रसाद बसेर कविता मिश्रा व शिक्षक उपस्थित होते.

सरस्वती पूजनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. मान्यवरांनी सर्व दहावीच्या विद्यार्थ्यांना भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. नववीची विद्यार्थिनी देवयानी येवतकर, वर्गशिक्षक पवन मोहता, उमेश कुलट, सेवियर नाईक यांनी गीत सादर केले. त्यानंतर वर्ग नववीच्या विद्यार्थ्यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी खेळांचे आयोजन केले. त्यानंतर दहावीचे वर्गशिक्षक प्रमोद वसु यांनी आपल्या वर्गाच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला व मुलांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन नेतल राठी व देवयानी यवतकर यांनी केले. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# वडाळी देशमुख येथे संत चतुर्भूज महाराजांचा पुण्यतिथी महोत्सव अखंड हरिनाम सप्ताह

वि. प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**अकोट:** संत चतुर्भूज महाराज संस्थान, वडाळी देशमुख यांच्या वतीने परमहंस संत चतुर्भूज महाराज यांचा ५० वा पुण्यतिथी महोत्सव तसेच ६८ वा श्रीमद् भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या भक्तिभावात साजरा करण्यात येणार आहे.

हा महोत्सव फाल्गुन शुद्ध चतुर्थी, शनिवार दि. २१ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रारंभ होणार असून फाल्गुन शुद्ध द्वादशी, शनिवार दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी सांगता होणार आहे. दररोज सकाळी ५ वाजता काकडा, सकाळी ९ ते १२ श्रीमद् भागवत कथा, दुपारी ३ ते ५ हरिपाठ, सायंकाळी ६ ते ७ हरिनाम आणि रात्री ९ ते ११ नामवंत किर्तनकारांची हरिकीर्तने होणार आहेत.

महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकारांचे कीर्तन पुढीलप्रमाणे आयोजित करण्यात आले आहे –

दि. २१/२/२०२६ रोजी ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज पाटील (बुलढाणा), दि. २२/२/२०२६ रोजी ह.भ.प. समाधान महाराज शर्मा, दि. २३/२/२०२६ रोजी ह.भ.प. रामराव महाराज ढोक, दि. २४/२/२०२६ रोजी ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज नामदास, दि. २५/२/२०२६ रोजी ह.भ.प. डॉ. रामकृष्ण महाराज लहवितकर, दि. २६/२/२०२६ रोजी ह.भ.प. संजय महाराज पाचपोर, दि. २७/२/२०२६ रोजी ह.भ.प. सोपान महाराज सानप, तर दि. २८/२/२०२६ रोजी सकाळी १० ते १२ काल्याचे कीर्तन ह.भ.प. संदिपान महाराज हसेगावकर यांच्या वतीने होणार आहे. या सप्ताहात भागवताचार्य ह.भ.प. श्री पंकज महाराज पवार (कारंजालाड) यांच्या मुखातून श्रीमद् भागवत कथा प्रवचन होणार आहे. तसेच शुक्रवारी संतपूजन सोहळा व माहेरवासी महिलांचा सन्मान समारंभ आयोजित करण्यात आला आहे. शनिवार दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजता श्रींची भव्य पालखी गावातून ढोल-ताशे, पताका व दिंड्यांसह मिरवणुकीने निघणार आहे.

# महिलांची वर्दळ असलेल्या दुकानांमध्ये व सार्वजनिक ठिकाणी सी. सी. टीव्ही कॅमेरे लावा

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

◆ शिवसेना महिला आघाडीची मागणी



**अकोला:** अकोल्यात उघडकीस आलेल्या ठ परी बिंदी घर ठ प्रकरणामुळे महिलांसोबत कोणत्या नीच दर्जाचे प्रकरण घडू शकते याचा अनुभव नुकताच आला आहे. अशा भयंकर प्रकरणांमुळे एक प्रकारे महिलांची सुरक्षितताच धोक्यात आलेली आहे. ज्या ठिकाणी महिलांची वर्दळ असते अशा ठिकाणी प्रशासनाने सी. सी. टीव्ही कॅमेरे तातडीने लावावेत. अशी मागणी शिवसेना महिला आघाडीच्या ( उबाठा ) जिल्हा संघटिका सरिता वाकोडे व सहकाऱ्यांनी केली आहे.

या मागणीचे निवेदन त्यांनी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर जिल्हा पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, व सिटी कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक संजय गवई यांना सादर केले.

ज्या दुकानांमध्ये महिला खरेदी करण्यासाठी जातात त्या दुकानांमध्ये कोणतीही एक्स्ट्रा खोली अथवा कंपार्टमेंट असू नये, ज्या भागात महिलांच्या वस्तूंची जास्त दुकाने आहेत त्या भागात महिला व पुरुष पोलिसांची ड्युटी लावून त्या भागात त्यांची गस्त वाढवावी. या मागण्यांचा गांभीर्याने विचार न झाल्यास शिवसेना महिला आघाडी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन उभारेल असाही इशारा देण्यात आला आहे.

निवेदन देताना शिवसेना नगरसेविका सोनाली सरोदे, शहर संघटिका वर्षा पिसोडे, उपजिल्हा संघटिका कल्पना रहाटे, निकिता कवडे, रंजना हरणे, निशा भारुका, शितल गोतमारे, पूजा धनोकार, शुभांगी येवले, आरती पडसकार, अपर्णा कावरे, सुलभा देशमुख, रेखा तुमेकर, वनिता कुलकर्णी, ऐश्वर्या गावंडे, दिपाली मानकर, प्रियंका कवर, वृषाली नंदनवार व इतरही महिलांचा समावेश होता.

# केळीवेळीच्या विद्यार्थिनींची राज्यस्तरीय हँडबॉल स्पर्धेसाठी निवड

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**अकोला:** केळीवेळी येथील श्री सखाराम महाराज विद्यालयाच्या सहा विद्यार्थिनींची राज्यस्तरीय शालेय हँडबॉल स्पर्धेसाठी निवड झाली असून या स्पर्धेसाठी त्या नांदेड येथे रवाना झाल्या आहेत. या स्पर्धेत त्या अमरावती विभागाचे प्रतिनिधित्व करीत आहेत.

निवड झालेल्या विद्यार्थिनींमध्ये काजल आगरकर, गौरी आत्तुरकार, माहेश्वरी भालेराव, श्वेता वाघमारे, धनश्री बावने व वैष्णवी कानपुरे यांचा समावेश आहे.



या विद्यार्थिनी प्रफुल पुरंदरे व श्रद्धा मोहोळ यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेत सहभागी होत आहेत. शाळेचे मुख्याध्यापक थोरात व शाळा समितीचे अध्यक्ष डॉ. राजकुमार बुले यांनी या यशासाठी मोलाचे सहकार्य केले आहे.

तसेच क्रीडाशिक्षक अमोल चिलात्रे, सौर, नारखेड व मलीये यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थिनींनायश मिळाले.

# पावसाळ्यापूर्वी शेतरस्ते सुस्थितीत; ४५० मार्गांचे काम तातडीने सुरू होणार : आ. प्रकाश भारसाकळे

वि. प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**अकोट :** अकोट विधानसभा क्षेत्रातील शेत पाणंद रस्त्यांची दुरवस्था लक्षात घेता पावसाळ्यापूर्वी कामे पूर्ण करण्यासाठी गुरुवारी तहसील कार्यालयात आ. प्रकाश भारसाकळे यांच्या उपस्थितीत आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मंडळ अधिकारी, पटवारी व प्रगतिशील शेतकरी उपस्थित होते.

बैठकीत अकोट तालुक्यात ४०० व तेल्हारा तालुक्यात ३५० असे एकूण ७५० अतिक्रमित शेतरस्ते असल्याचे स्पष्ट झाले. तर विना-अतिक्रमित रस्त्यांची संख्या अकोटमध्ये २३५ व तेल्हारात २११ अशी एकूण सुमारे ४५० आहे. त्यामुळे पहिल्या टप्प्यात विना-अतिक्रमित शेतरस्त्यांची कामे तातडीने हाती घेण्याचा निर्णय झाला आहे. ३३ फुटांपेक्षा रुंद असलेल्या मोकळ्या रस्त्यांवर प्राधान्याने काम होणार असून २२ फुटांखालील रस्त्यांचा या टप्प्यात समावेश होणार नाही. अतिक्रमित ७५० रस्ते मोकळे करण्यासाठी शेतकऱ्यांच्या बैठका घेऊन पुढील कार्यवाही केली जाणार असून आवश्यक असल्यास पोलिस बंदोबस्तात कारवाई करण्यात येईल. मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेअंतर्गत क्लस्टर पद्धतीने निविदा प्रक्रिया राबवून प्रथम मुरूम रस्ते तयार करण्यात येणार आहेत. जास्तीत जास्त रस्ते मोकळे करणाऱ्या अधिकारी व पटवाऱ्यांचा जाहीर सत्कार केला जाईल, असे आ. भारसाकळे यांनी सांगितले.

# अपघाती विम्यामुळे मृतकाच्या वारसाच्या खात्यात २ लाख

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**कुटासा:** अकोला वाशीम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक नाबार्डाच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा प्रभाविपणे राबवत असुन या योजनेचा लाभ अकोट तालुक्यातील एका खातेदाराच्या कुंटुबाला मिळाला आहे. कुटासा शाखेचे खातेदार किशोर साहेबराव तरोळे यांचा जगली जनावराची धडक लागुन दुर्दैवी मृत्यू झाला होता. या घटनेची माहिती मिळताच कुटासा शाखेचे शाखाधिकारी ओम सुभाष पाटील यांनी तत्काळ खातेदाराच्या नातेवाईकांना संपर्क साधून संमंधित खातेदाराची प्रधानमंत्री जीवन विमा योजने अंतर्गत २ लाख रुपयांचा अपघात विमा पॉलिसी अस्तित्वात असल्याची माहिती दिली. त्यानंतर वारसांकडुन आवश्यक क्लेम फॉर्म भरुन घेऊन सर्व कागदपत्राची पूर्तता करण्यात आली व हे प्रकरण मुख्य कार्यालयातील प्रफुल पाटील यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले सदर विमा



दावा मंजुर करुन घेत मुत खातेदाराच्या पत्नी श्रीमती अर्चना किशोर तरोळे यांच्या खात्यात जमा करुन प्रमाण पत्र देण्यात आले यावेळी तालुका प्रमुख उमेश मोरे शाखाधिकारी आशिष घोम, मंगेश काळे, आशिष ठाकरे, उत्तम अरबट, अभिजित भांबुरकर हर्षल तरोळे उपस्थित होते. कुंटुबातील कर्ता व्यक्ती गेल्याने मिळालेल्या लाभाचा आधार मिळाल्याची भावना वारसांनी व्यक्त केली यावेळी बँकेचे अध्यक्ष संतोष कुमार कोरपे सचालक मंडळ तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनंत वैध यांचे आभार मानले दरम्यान जास्तीत जास्त खातेदारांनी सामाजिक सुरक्षा योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन बँकेकडून करण्यात आले.

## कार्यालय नगर परिषद कारंजा
### जि. वाशिम

जा.क्र./नपका/ आस्थापना विभाग/ /२०२६ दि./ /२०२६

कारंजा नगर परिषदला खालील कामे करून घेण्याकरिता नोंदणीकृत कंत्राटदाराकडून सीलबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची किंमत (अंदाजे) | बयाणा रक्कम | कोरे निविदा प्रपात्राची रक्कम | कामाचा कालावधी पावसाळा धरून |
|---|---|---|---|---|---|
| १ | गौतम नगर येथील नगर परिषद अंतर्गत असलेले सभागृह दुरुस्ती व रंगरंगोटी करणे | ८७०००० | १००० | ५०० | ३ महिने |
| २ | भिमनगर येथील न.प. अंतर्गत असलेल्या सभागृहाची व संत सेवालाल महाराज सभागृह दुरुस्ती व रंगरंगोटी करणे | ९५०००० | १००० | ५०० | ३ महिने |
| ३ | कोहिनूर कॉलनी संत गजानन महाराज सभागृह मानोरा रोड दुरुस्ती व रंगरंगोटी करणे | ५४०००० | १००० | ५०० | ३ महिने |
| ४ | इदगाव मैदान आणि कब्रस्तान दुरुस्ती व रंगरंगोटी करणे | ८४०००० | १००० | ५०० | ३ महिने |

**शर्ती व अटी:-**

१) बयाणा रक्कम नगदीने किंवा एफ. डी. आर. स्वरुपात मुख्याधिकारी न.प. कारंजा यांचे नावे भरावी लागेल,
२) कोरे निवीदा फॉर्म दि. १३/२/२०२६ मा दुपारी २.०० वाजेपर्यंत ५०० रोख भरुन रोखपाल यांचेकडुन प्राप्त करून घ्यावेत
३) सिलबंद निवीदा दि.१६/२/२०२६ ला ५:०० वाजेपर्यंत सादर करावी,
४) तांत्रिक निफाफा क्र. १ मध्ये १. कंत्राटदार नोंदणीकृत प्रमाणपत्र २. पॅन कार्ड ३. आधार कार्ड
५) आर्थिक बोलीचा लिफाफा क्र. २ सदर लिफाफ्यामध्ये दर सादर करावे.
६) कोणतेही एक किंवा सर्व निवीदा कारण न दर्शविता निवीदा रद्द करण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवले आहे.
७) सशर्त निविदेचा विचार केला जाणार नाही.
८) प्रत्येक नमुद कामाची निवीदा स्वतंत्र भरावी.
९) निवीदा धारकांचे देयकातुन नियमानुसार विक्री कर व इतर कपात करण्यात येईल.
१०) निधीच्या उपलब्धतेनुसार देयक अदा करण्यात येईल.
११) ईतर शर्ती व अटी तसेच साहित्य यादीचे विवरण कार्यालयीन वेळेत संबंधित विभागात पहावयास मिळतील.

**(महेश वाघमोडे) मुख्याधिकारी**
नगर परिषद कारंजा (लाड)

**NAME CHANGE**
PASSPORT NO
K8891974
FILE NO
NGPZ05098611
**OLD NAME**
NAZEMA BEGUM
**NEW NAME**
NAZEMA BEGUM
MOHAMMAD HANIF RANGARI
--:ADDRESS:-
RANGARI MOHALLA,
NEAR ANKUMAN SCHOOL,
BALAPUR, DIST: AKOLA
MAHRASHTRA – 444001

**HUSBAND NAME CHANGE**
PASSPORT NO
K8891974
FILE NO
NGPZ05098611
**OLD NAME**
MOHAMMAD HANIF
**NEW NAME**
MOHAMMAD HANIF
SABUDDIN RANGARI
--:ADDRESS:-
RANGARI MOHALLA,
NEAR ANKUMAN SCHOOL,
BALAPUR, DIST: AKOLA
MAHRASHTRA – 444001

**NAME CHANGE**
PASSPORT NO
K8891975
FILE NO
NGPZ05098711
**OLD NAME**
MOHAMMAD HANIF
**NEW NAME**
MOHAMMAD HANIF
SABUDDIN RANGARI
--:ADDRESS:-
ANKUMAN SCHOOL
ROAD, RANGARI KIRANA,
BALAPUR, DIST: AKOLA
MAHARASHTRA – 444001

**FATHER NAME CHANGE**
PASSPORT NO
K8891975
FILE NO
NGPZ05098711
**OLD NAME**
SABUDDIN
**NEW NAME**
SABUDDIN SHAIKh
ABDULLA RANGARI
--:ADDRESS:-
ANKUMAN SCHOOL
ROAD, RANGARI KIRANA,
BALAPUR, DIST: AKOLA
MAHARASHTRA – 444001

**WIFE NAME CHANGE**
PASSPORT NO
K8891975
FILE NO
NGPZ05098711
**OLD NAME**
NAZEMA BEGUM
**NEW NAME**
NAZEMA BEGUM
MOHAMMAD HANIF RANGARI
--:ADDRESS:-
ANKUMAN SCHOOL
ROAD, RANGARI KIRANA,
BALAPUR, DIST: AKOLA
MAHARASHTRA – 444001

**NAME CHANGE**
PASSPORT NO
R5383820
FILE NO
NG1061509873817
**OLD NAME**
MOHAMMAD FAIZ
**NEW NAME**
MOHAMMAD FAIZ
NAKMUDDIN RANGARI
--:ADDRESS:-
BADA MOMINPURA,
ANKUMAN ROAD,
BALAPUR, DIST: AKOLA
MAHARASHTRA – 444001

**FATHER NAME CHANGE**
PASSPORT NO
R5383820
FILE NO
NG1061509873817
**OLD NAME**
NAKMODDIN RANGARI
**NEW NAME**
NAKMUDDIN
SABUDDIN RANGARI
--:ADDRESS:-
BADA MOMINPURA,
ANKUMAN ROAD,
BALAPUR, DIST: AKOLA
MAHARASHTRA – 444001

**MOTHER NAME CHANGE**
PASSPORT NO
R5383820
FILE NO
NG1061509873817
**OLD NAME**
ALMAS TABASSUM
**NEW NAME**
ALMAS TABASSUM
NAKMUDDIN RANGARI
--:ADDRESS:-
BADA MOMINPURA,
ANKUMAN ROAD,
BALAPUR, DIST: AKOLA
MAHARASHTRA – 444001

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शुक्रवार, दि. ०६ फेब्रुवारी २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# क्रेशर खदानात वाहनांच्या बॅटऱ्यांची चोरी; २१ हजारांचा मुद्देमाल लंपास

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**दारव्हा :** तालुक्यातील ग्राम बागवाडी येथील साई स्टोन क्रेशर गिट्टी खदान परिसरात अज्ञात चोरट्यांनी वाहनांमधील बॅटऱ्यांची चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी दारव्हा पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे.

फिर्यादी महादेवराव बापुराव काळे (वय ६५, रा. सायखेडा, ता. दारव्हा) यांच्या मालकीच्या एका ४०७ वाहनासह अन्य सहा ट्रॅक्टरमधील बॅटऱ्या अज्ञात आरोपीने चोरून नेल्या. एकूण सात वाहनांतील बॅटऱ्यांची किंमत सुमारे २१ हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमूद आहे. ही चोरी ३१ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० ते १ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ८.३० दरम्यान घडली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी पंचनामा केला असून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे अज्ञात आरोपीचा शोध सुरू आहे. ग्रामीण भागातील वाढत्या चोरीमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

# वार्षिक योजनेच्या 692 कोटींच्या प्रारूप आराखड्यास मंजुरी

## जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत निर्णय : राज्य समितीकडे पाठपुरावा करणार - पालकमंत्री संजय राठोड

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी




**यवतमाळ :** जिल्हा वार्षिक योजना सन 2026-27 साठी सर्वसाधारण, आदिवासी उपयोजना आणि अनुसूचित जाती उपयोजना अशा तिन्ही योजनांसाठी एकूण 692.74 कोटी रुपयांच्या प्रारूप आराखड्यास जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. ही माहिती पालकमंत्री तथा जिल्ह्याचे पालक मंत्री ना. संजय राठोड यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात पालकमंत्री संजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. बैठकीनंतर ते माध्यमांशी बोलत होते. यावेळी राज्याचे आदिवासी विकास मंत्री ना. प्रा. डॉ. अशोक वुईके, उद्योग राज्यमंत्री ना. इंद्रनिल नाईक, आमदार राजू तोडसाम, बाळासाहेब मांगुळकर, संजय देरकर, किसन वानखेडे, जिल्हाधिकारी विकास मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, पोलीस अधीक्षक कुमार चिंता, सहाय्य जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी अमीत रंजन, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर आडे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

या प्रारूप आराखड्यानुसार सर्वसाधारण योजनेसाठी 471.58 कोटी रुपये, आदिवासी उपयोजनेसाठी 137.16 कोटी रुपये तर अनुसूचित जाती उपयोजनेसाठी 84 कोटी रुपये इतकी तरतूद करण्यात आली आहे. या आराखड्यास राज्यस्तरीय समितीची मान्यता मिळविण्यासाठी पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे पालकमंत्री राठोड यांनी स्पष्ट केले.

### गतवर्षीच्या निधीचा 77 टक्के खर्च

■ सन 2025-26 या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजनेसाठी एकूण 754.38 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. यापैकी 538.45 कोटी रुपयांना प्रशासकीय मंजुरी, तर 277.86 कोटी रुपयांचे वितरण झाले आहे. आतापर्यंत 214.46 कोटी रुपयांचा खर्च झाला असून वितरित निधीच्या तुलनेत खर्चाची टक्केवारी 77.18 टक्के असल्याची माहिती पालकमंत्र्यांनी दिली. खर्च न झालेल्या निधीचा पुनर्नियोजन आराखडाही या बैठकीत मंजूर करण्यात आला. संबंधित यंत्रणांनी उर्वरित निधीचा शंभर टक्के खर्च करण्याच्या सूचना पालकमंत्री राठोड यांनी दिल्या. आदिवासी व अनुसूचित जाती उपयोजनांचा निधी इतरत्र वळवता येणार नाही. आदिवासी उपयोजना आणि अनुसूचित जाती उपयोजनांचा निधी हा ठरावीक आराखड्यानुसारच खर्च केला जातो. हा निधी अन्यत्र वळवता येत नसल्याचेही पालकमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले. जिल्हा प्रशासनाने निधीचा अधिकाधिक प्रभावी वापर करून कामे वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश देण्यात आले.

### शेतकरी हा शासन-प्रशासनाचा केंद्रबिंदू

■ जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी आणि शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासन व जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून विविध योजना आणि नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत असल्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी सांगितले. "शेतकरी हा शासन-प्रशासनाचा केंद्रबिंदू आहे. शेतकऱ्यांनी आत्महत्येसारखे कठोर पाऊल उचलू नये, शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे," असे आश्वासन त्यांनी दिले. बैठकीची प्रस्तावना जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केली, तर आभार जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर आडे यांनी मानले.

# सरपंच व सदस्याच्या पतीत बाचाबाची; जीवे मारण्याच्या धमकीचा व्हिडिओ व्हायरल

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**महागाव :** तालुक्यातील काळी (दौ.) येथे ग्रामपंचायतीच्या कामावरून निर्माण झालेला वाद थेट भरचौकात बाचाबाची आणि जीवे मारण्याच्या धमकीपर्यंत पोहोचला आहे. निकृष्ट व बोगस कामांविरोधात तक्रार केल्याच्या कारणावरून सरपंच पती व ग्रामपंचायत सदस्य पती यांच्यात तीव्र वाद झाला, असून या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला आहे.

ग्रामपंचायतीअंतर्गत सुरू असलेल्या विकासकामांमध्ये भ्रष्टाचार व दर्जाहीन काम होत असल्याचा आरोप ग्रामपंचायत सदस्य पती सुनील टेमकर यांनी केला होता. या तक्रारींमुळे संतप्त झालेल्या सरपंच निशा संतोष राठोड यांच्या पती संतोष राठोड यांनी कामाच्या ठिकाणी टेमकर यांना अडवून हातात लाकूड घेऊन धमकावल्याचा आरोप आहे. "पुन्हा तक्रार केली तर जिवंत सोडणार नाही," अशी धमकी दिल्याचा दावा टेमकर यांनी केला आहे.

या प्रकारामुळे लोकशाही मार्गाने तक्रार करणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, गावात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. 'पतीराज' ग्रामपंचायत कारभारात हस्तक्षेप करत असल्याच्या आरोपामुळे प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

दरम्यान, या प्रकरणात दोन्ही बाजूंनी परस्परविरोधी दावे करण्यात आले असून, पुढील कारवाईकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

> ■ "ग्रामपंचायतीतील कामे डमी कंत्राटदारांच्या माध्यमातून करून घेतली जात आहेत. निकृष्ट कामांविरोधात तक्रार केल्याचा राग मनात धरून मला भरचौकात धमकावण्यात आले. प्रशासनाने वेळेत दखल घेतली नाही, तर भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवणाऱ्यांना गप्प करण्याची ही पद्धत ठरेल."
> - सुनील टेमकर, ग्रामस्थ / सदस्य पती, काळी (दौ.)

> ■ "राजकीय द्वेषातून आणि वैयक्तिक आकसातून माझ्या पतीविरोधात खोटे आरोप केले जात आहेत. मागील पाच वर्षांतील सर्व तक्रारी प्रशासनाने चौकशीअंती फेटाळल्या आहेत. बदनामी करण्याचा हा प्रकार असून आम्ही कायदेशीर मार्गाने उत्तर देऊ."
> - सौ. निशा संतोष राठोड, सरपंच, काळी (दौ.)

# महागाव–बिटरगाव पोलिस प्रवाशांसाठी ठरले देवदूत

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी



**ढाणकी :** घनघोर अंधार, निर्जन माळरान, आणि अचानक स्कूल बसचे दोन्ही टायर पंक्चर होऊन बस जागच्या जागी अडकली... बसमध्ये लहान मुले, महिला आणि भीतीचे वातावरण. अशा अत्यंत तणावपूर्ण परिस्थितीत महागाव व बिटरगाव पोलिसांनी दाखवलेली तत्परता आणि संवेदनशीलता माणुसकीचे दर्शन घडवणारी ठरली. दोन पोलीस ठाण्यांच्या समन्वयामुळे संभाव्य मोठा अनर्थ टळला असून, प्रवाशांनी पोलिसांचे मनापासून आभार मानले आहेत.

एका खाजगी कार्यक्रमानिमित्त पुसद येथे गेलेली एक स्कूल बस मंगळवारी रात्री सुमारे १ वाजता ढाणकीकडे परतत असताना महागाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील निर्जन माळरानात अचानक बसचे एकामागोमाग दोन्ही टायर पंक्चर झाले. रात्र, सामसूम रस्ता आणि आजूबाजूला कुठलीही वस्ती नसल्याने बसमधील प्रवासी भयभीत झाले. अनेक महिलांच्या अंगावर दागिने होते, तर लहान मुले अंधारामुळे प्रचंड घाबरली होती.

या घटनेची माहिती काही सतर्क नागरिकांनी तात्काळ बिटरगाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार पांडुरंग शिंदे यांना दिली. प्रसंगाचे गांभीर्य लक्षात घेऊन ठाणेदार शिंदे यांनी लगेचच महागावचे ठाणेदार धनराज निळे यांच्याशी संपर्क साधला.

ठाणेदार निळे यांनी क्षणाचाही विलंब न करता आपल्या पथकासह घटनास्थळी धाव घेतली. पोलीस नाईक सुनील माथणे व चालक विवेक पारडकर यांच्यासह त्यांनी परिस्थिती हाताळली. मध्यरात्री पंक्चर काढणारे दुकान मिळणे कठीण असताना, पोलिसांनी स्वतः पुढाकार घेत दुकानदाराला शोधून दुकान उघडायला लावले आणि प्रत्यक्ष उभे राहून बसचे पंक्चर काढून घेतले.

बस पूर्णपणे दुरुस्त होऊन सुरक्षितपणे मार्गस्थ होईपर्यंत पोलीस पथक घटनास्थळीच तैनात होते.

"आम्ही अत्यंत घाबरलो होतो. अशा वेळी पोलिस देवदूतासारखे धावून आले," अशी भावना अनेक प्रवाशांनी व्यक्त केली.

महागाव व बिटरगाव पोलिसांनी दाखवलेली ही संवेदनशीलता व कर्तव्यनिष्ठा परिसरात कौतुकाचा विषय ठरत असून, पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ करणारी ठरली आहे.

# अतूट श्रद्धेचे दर्शन; बाबा कंबलपोष दर्गा दर्शनासाठी नगरसेवकाची सायकलवारी

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी



**आर्णी :** हिंदू-मुस्लिम एकतेचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या आर्णी येथील बाबा कंबलपोष दर्गा शरीफ येथे ऊर्सनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही कारंजा येथील नगरसेवक इर्शाद अली पैलवान यांनी सायकलने प्रवास करत दर्शन घेतले. गेल्या चार वर्षांपासून ते नियमितपणे सायकलने हा श्रद्धेचा प्रवास करत असून, यंदा ५ फेब्रुवारी रोजी त्यांनी बाबा कंबलपोष दर्ग्याचे दर्शन घेतले.

कारंजा ते आर्णी असा सायकल प्रवास करून नगरसेवक इर्शाद अली पैलवान आर्णी येथे दाखल होताच बाबा कंबलपोष दर्गा कमिटीचे सचिव रियाज बेग यांच्या हस्ते त्यांचा शाल देऊन सत्कार करण्यात आला. त्यांच्या या उपक्रमाचे दर्गा परिसरात कौतुक करण्यात आले.

**कारंजा ते आर्णी सायकल यात्रेची परंपरा कायम**

या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते जानी सोलंकी, नगरसेवक अशपाक शेख, पत्रकार परवेज बेग, मनोज माघाडे, फैजान शेख, शाहेब खा. यामुद्दिन नवाब, शाहिद मलनस, रफिक शेख तसेच दर्गा कमिटीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अतूट श्रद्धा, भक्ती आणि सामाजिक सलोखा जपणारा हा सायकल प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत असून, बाबा कंबलपोष दर्ग्याच्या परंपरेतील धार्मिक-सामाजिक एकतेचे दर्शन घडवत आहे.

# ज्येष्ठ पत्रकार नारायणराव वंजारी यांचे निधन

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी



**नेर :** नेर तालुक्यातील पत्रकारितेला दिशा देणारे व ग्रामीण जनतेच्या प्रश्नांना निर्भीडपणे वाचा फोडणारे ज्येष्ठ पत्रकार नारायणराव वंजारी यांचे ६ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १२.३० वाजताच्या सुमारास हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. ते लोकमतचे तालुका प्रतिनिधी किशोर वंजारी यांचे वडील होत. १९८०–९० च्या दशकात साधनांची कमतरता असतानाही त्यांनी ग्रामीण भागातील जनतेच्या समस्या प्रामाणिकपणे समाजासमोर मांडल्या. त्यांच्या निर्भीड व समाजाभिमुख पत्रकारितेमुळे नेर तालुक्यातील पत्रकारितेला नवी दिशा मिळाली. त्यांच्या कार्यामुळे अनेक सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना न्याय मिळाला. त्यांच्या अचानक जाण्याने नेर तालुक्यातील पत्रकारिता क्षेत्राचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर आज दुपारी १ वाजता मोझर येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. नेर तालुका पत्रकार संघटनेच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# 'सन्मान जवानांचा' : डोंगरखर्ड्यात सेवानिवृत्त वीरांचे जल्लोषात स्वागत

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी



**कळंब :** देशाच्या सीमेवर ऊन, वारा, पाऊस आणि कडाक्याच्या थंडीत अहोरात्र पहारा देत मातृभूमीचे रक्षण करणाऱ्या वीर जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी डोंगर खर्डा (ता. कळंब) येथे 'सन्मान जवानांचा' या भावनिक उपक्रमाअंतर्गत सेवानिवृत्त सैनिकांचा भव्य स्वागत व सत्कार सोहळा पार पडला.

आपली सेवा पूर्ण करून मायभूमीत परतलेले नायब सुभेदार (निवृत्त) राजेंद्र नारायण गेडाम आणि हवालदार (निवृत्त) प्रशांत मुंगले यांच्या आगमनानिमित्त समस्त गावकऱ्यांनी एकत्र येत हा गौरव सोहळा आयोजित केला होता. बसस्थानक परिसरात जवानांचे आगमन होताच फटाक्यांची आतषबाजी, ढोल-ताशांच्या गजरात आणि नागरिकांच्या जयघोषात त्यांचे स्वागत करण्यात आले. गावातून काढण्यात आलेल्या मिरवणुकीदरम्यान ठिकठिकाणी नागरिकांनी पुष्पहार, शाल व त्रिफळा देत जवानांचा सन्मान केला. अनेक महिलांनी ओवाळणी करून आरती केली. या आपुलकीच्या स्वागतामुळे जवानांचेही डोळे पाणावले.

राजेंद्र गेडाम यांनी सन 2002 मध्ये आर्टिलरी रेजिमेंटमध्ये भरती होऊन 24 वर्षांची प्रदीर्घ सेवा बजावत नायब सुभेदार पदावरून सेवानिवृत्ती स्वीकारली, तर प्रशांत मुंगले यांनी मराठा लाईट इन्फंट्री रेजिमेंटमध्ये हवालदार पदावरून सेवा पूर्ण केली आहे. आदर्श विद्यालयात पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन तसेच ग्रामपंचायत कार्यालयातर्फे शाल-त्रिफळा देत जवानांचा अधिकृत सत्कार करण्यात आला. आपल्या घरी पोहोचताच जवानांनी आई-वडिलांना दिलेली सलामी उपस्थितांचे मन हेलावून गेली. हे क्षण कुटुंबीयांसाठी आयुष्यभराची आठवण ठरले. डोंगरखर्डा येथील जाकीर शेख गफार आणि संजय राठोड यांनीही भारतीय सेनेत सेवा बजावली आहे, तर निश्चल कन्ना के. व कुमारी सारिका के. राम हे सध्या सीमा सुरक्षा दलात कार्यरत आहेत.

# सांस्कृतिक कार्यक्रमावरून उभा केलेला वाद राजकीय हेतूने प्रेरित

## शिक्षण सभापती रसूल पटेल यांची पत्रकार परिषदेत माहिती

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी



**उमरखेड :** येथील अब्दुल गफूर शहा नगर परिषद उर्दू उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळेत प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात सादर झालेल्या एका गीतावरून निर्माण झालेला वाद हा निव्वळ गैरसमजातून आणि राजकीय हेतूने प्रेरित असून बदनामीचे षड्यंत्र आहे, असे स्पष्ट मत शिक्षण सभापती रसूल पटेल यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

पटेल म्हणाले की, प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून शाळेत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, राज्यात जाहीर करण्यात आलेल्या शोकदिवसामुळे हे कार्यक्रम पुढे ढकलून ३१ जानेवारी रोजी घेण्यात आले. यावेळी सादर करण्यात आलेले गीत हे १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्याच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर आधारित असून, त्याचा १९६५ च्या भारत–पाक युद्धाशी कोणताही संबंध नाही, हे त्यांनी स्पष्ट केले. सदर गीतातून १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यात मुस्लिम उलमा व हिंदू पंडितांनी एकत्र येऊन ब्रिटिश सत्तेविरुद्ध दिलेल्या लढ्याचा इतिहास मांडण्यात आला आहे. अन्यायाविरुद्ध संघर्ष, देशासाठी त्याग आणि परकीय राजवटीविरुद्ध लढा उभारण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी, हाच या गीतामागील उद्देश असल्याचे पटेल यांनी सांगितले.

"या गीतातून कोणत्याही धर्माचा प्रचार करण्यात आलेला नाही, तसेच राष्ट्रीय एकात्मतेला बाधा पोहोचवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. शाळेत सर्व धर्मांचा समान सन्मान राखला जातो," असेही त्यांनी ठामपणे नमूद केले. मुख्याध्यापकांनी दिलेल्या खुलाशानुसार ही तक्रार राजकीय हेतूने प्रेरित असून तथ्यहीन असल्याचे स्पष्ट झाले आहे. अल्पसंख्याक समाजाची प्रतिमा मलिन करण्याच्या उद्देशानेच हा वाद उकरून काढण्यात आल्याचा आरोपही पटेल यांनी केला. समाजातील गैरसमज दूर करून शैक्षणिक वातावरण अबाधित ठेवण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

या पत्रकार परिषदेला साजीद जहागीरदार (स्थायी समिती सदस्य), प्रकाश शिकारे (बांधकाम सभापती), विरेंद्र खंदारे (आरोग्य सभापती), अ. गणी शहा (नगरसेवक), वासीफ पठान, सै. सिकंदर सिध्दू जगताप, बाबुभाई हिना आदी उपस्थित होते.

### अब्रुनुकसानीचा दावा दाखल करणार

■ "आमच्यावर वैयक्तिक स्वरूपाचे जे बिनबुडाचे आरोप करण्यात आले आहेत, त्याबाबत आम्ही शांत बसणार नाही. केवळ बदनामीच्या उद्देशाने तक्रार करणाऱ्यांविरोधात लवकरच न्यायालयात अब्रुनुकसानीचा दावा दाखल केला जाईल," असा इशाराही रसूल पटेल यांनी दिला.

# रेती चोरी प्रकरणातील दोन आरोपींना अटक

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**आर्णी :** तालुक्यात अवैध रेती उत्खनन व वाहतुकीविरोधात पोलिसांनी कडक कारवाई करत दोन आरोपींना ताब्यात घेतले असून सुमारे ५ लाख १८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. कुऱ्हाडु फाटा रस्त्यावर गस्तीदरम्यान संशयास्पद वाहनाची तपासणी केली असता अवैधरित्या उत्खनन केलेली रेती वाहतूक होत असल्याचे आढळून आले. वाहनातून ३ ब्रास रेती व संबंधित वाहन पोलिसांनी जप्त केले. या प्रकरणी आर्णी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींविरोधात भारतीय न्याय संहिता व मजुम कायद्यान्वये कारवाई सुरू आहे. पुढील तपास पोलीस करीत असून अशा अवैध प्रकारांविरोधात कारवाई सुरूच राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

## जाहीरनामा

यात्द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते, अर्जदार- गणेश महादुजी कान्हेकर रा.कान्हा ता महागांव जि. यवतमाळ यांनी त्यांच्या नाता करीता श्रेयांश विनायक कान्हेकर ह्याचा जन्म/सचिव ग्रा.पचायत कान्हा ता. महागांव येथे दि. 24/09/2023 रोजी झाला आहे, परंतु त्यांच्या जन्माची नोंद. सचिव. ग्रा.पचायत कान्हा नगरपंचायत, महागांव येथे नसल्यामुळे महाराष्ट्र जन्म नोंदणी अधिनियम कलम 13 (3) नगरपंचायत, महागांव यांना जन्म नोंद घेण्याबाबत प्रकरण या कार्यालयास सादर केले आहे.

तरी हितसंबंधित व्यक्तीचे उपरोक्त जाहीरनामाबाबत कोणाचा काही आक्षेप असेल तर त्यांनी आपले आक्षेप लेखी स्वरुपात कार्यालयीन वेळेत या कार्यालयात 15 दिवसाच्या आत सादर करावेत. मुदती नंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.

शिक्का

स्वा./-
तहसीलदार साहेब
तहसिल कार्यालय महागाव

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शुक्रवार दि. ६ फेब्रुवारी २०२६

http://epaper.citynewssuperfast.com




# पोकरातील भ्रष्टाचार, कारवाईची टांगती तलवार !

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अर्थात पोकरा योजनेतील भ्रष्टाचार आता चव्हाट्यावर आला असून, कृषी विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी केलेले अनेक गोरख धंदे आता उघड होत आहेत. कर्तव्यात कसूर आणि कामातील अनियमिततेमुळे दोषी आढळून आलेल्या 'त्या' १८ कर्मचाऱ्यांवर कारवाई कधी होणार असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. तर शेलुखडसे येथील पोकरा प्रकरणाची फेरतपासणी करण्यात यावी अशी मागणी केली जात असून गट नंबर ६३३ मधील कथित नियमबाह्य सिंचन विहीरीची सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी तक्रारदार यांनी केली आहे.

## *शेलुखडसे येथील पोकरा घोटाळ्याची फेरचौकशी करण्याची मागणी
## *कृषी विभागतील त्या १८ दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाई कधी ?
## *गट नंबर ६ ३ ३ त्या नियमबाह्य विहिरीची चौकशी होणे गरजेचे



रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथील पोकरा गैरप्रकरणाची तपास अधिकारी अनिल राठोड यांनी प्राथमिक तपासणी करून अहवाल विभागीय कृषी सहसंचालक अमरावती यांच्याकडे सादर केला आहे. त्या अनुषंगाने कृषी सहसंचालक यांनी फळबाग लागवड प्रकरणात कार्यवाही करण्याचे आदेश सुद्धा दिले आहेत. मात्र गट नंबर ६३३ मधील कथित नियमबाह्य सिंचन विहिर आणि फळबाग लागवड योजनेत खोटे प्रस्ताव सादर करून बोगस जिओ टॅग लोकेशन बाबत संबंधितांवर तात्काळ फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्याच्या मागणीकडे कानाडोळा करण्यात आला असल्याचे तक्रारदार यांचे म्हणणे आहे. तसेच गट नंबर ६०२ मधील गावठाण हद्दीत अतिक्रमण करून खोदलेल्या विहिरीच्या भरवशावर जे काही शासकीय अनुदान लाटले आहे त्याची सुद्धा कसून व सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी सुद्धा सदर तक्रारीत करण्यात आली होती. परंतु हा सर्वप्रकार अजूनही गुलदस्त्यातच अडकलेला आहे. याची फेरचौकशी करण्यात यावी अन्यथा लोकायुक्तांकडे नव्याने तक्रार दाखल करण्यात येईल अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. एकाच कुटुंबात लाखों रुपयांचे अनुदान हडपणाऱ्यांना बोगस फळबाग लागवड प्रकरणातून लाटलेले अनुदान ते सहज शासनाला परत करू शकतात. असे तक्रारदार यांचे म्हणणे असून या गैरप्रकरणामुळे ज्या पात्र शेतकऱ्यांना या घटकांपासून वंचित रहावे लागले या पापाचा धनी कोण ? असा प्रश्न उपस्थित होत आहे. परिणामी या घोटाळ्यात दोषी असणाऱ्यांवर केवळ वसुलीची कारवाई न करता संबंधितांवर फसवणुकीचे फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावे अशी मागणी करण्यात येत आहे. शिवाय एकच कुटुंबात लाखों रुपयांचे अनुदान देण्यात आले त्या सर्व प्रस्तावांची बारकाईने चौकशी करण्यात आली नसल्याचा आरोप सुद्धा केला जात आहे. त्यात गट नंबर ६०२ मधील नेटशेडच्या तांत्रिक बाबी तपासून अधिकृत पुरवठादार यांच्याकडून साहित्य खरेदी केले का ? याची तपासणी होणे गरजेचे आहे. या बाबत तक्रारदार विभागीय कृषी सहसंचालक अमरावती यांच्याकडे फेरतपासणीची मागणी करणार असल्याचे बोलले जात आहे. त्यांच्या तक्रारीची योग्य दखल न घेतल्यास सदर गंभीर प्रकरण महाराष्ट्राचे लोकायुक्त यांच्याकडे सादर करण्यात येणार असल्याची माहिती समोर येत आहे. शेलुखडसे येथील अनेक पात्र शेतकऱ्यांना डावलून कृषी विभागतील कर्मचाऱ्यांनी काही दलालांचीच घरे भरली आहेत. हा प्रकार चव्हाट्यावर आल्यानंतर आता अनेक तक्रारी पुढे येत आहेत. स्पिंकलर लाभ घेतला असल्याने ईतर लाभ घेता येत नाही ! असे म्हणत कृषी सहाय्यकांनी अनेक पात्र शेतकऱ्यांना डावलले असल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. तर दुसरीकडे एकाच कुटुंबात एकाच व्यक्तीच्या नावावर त्याच घटकाचा डबल लाभ देण्यात आला असल्याचे दिलेल्या तक्रारीत उजागर करण्यात आले आहे. ही अत्यंत गंभीर बाब असून या प्रकरणातील घोटाळ्याची फेरचौकशी होणे खुप गरजेचे आहे.




' मी, पोकरा योजनेतून विहीर मिळावी म्हणून अर्ज केला होता. आणि तो मंजूरही करण्यात आला होता. मात्र लगेचच रद्दही करण्यात आला. याचे कारण विचारले असता, तुम्ही याआधी तुषार संच घेतल्यामुळे पोकरातून तुम्हाला दुसरा लाभ मिळू शकत नाही असे सांगण्यात आले. आणि दुसरे कारण म्हणजे तुम्ही शेलुखडसे येथील रहिवाशी असले तरी तुमची जमीन नेर शिवारात आहे. मग त्याच शिवारात ईतर शेतकऱ्यांना लाभ कसा मिळाला ? हे माझे म्हणणे आहे. त्यामुळे आमच्या येथील पोकरा योजनेत मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाला असल्याचे स्पष्ट होत आहे. माझ्यावर झालेल्या अन्यायाची सुद्धा सखोल चौकशी व्हावी अशी अपेक्षा आहे.

**रवि अर्जुन खडसे, शेतकरी, शेलुखाडसे**




## थोडक्यात

### संत शिरोमणी नरहरी महाराज पुण्यतिथी संपन्न



●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●

संत शिरोमणी नरहरी महाराज पुण्यातिथी निमित्त संत नामदेव तुकाराम वारकरी परिषद सांस्कृतिक विभाग कारंजा आणि सकल सोनार समाजाच्या वतीने आणि मुख्यतः सोनार समाजाच्या पुढाकाराने स्थानिक आशिर्वाद गणेश मंदिर लालबागचा राजाच्या सभागृहामध्ये, बुधवार दिनांक ४ फेब्रुवारी रोजी संत नरहरी महाराज पुण्यतिथी सोहळा संपन्न करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रणिता मांगलकर, चिन्मयी मांगलकर, संगीता संतोष लोणकर, वैशाली अनिल बैतुले, अनुराधा सुनील बैतुले, प्रेरणा प्रथमेश अंगाईतकर, योगिता अनिल अंगाईतकर, प्रिया कैलास हिरुडकर, मंगला राजेंद्र अंगाईतकर, प्रभा श्रीकृष्ण अंगाईतकर, प्रतीक्षा विशाल अंगाईतकर ,वनिता विनोद अंगाईतकर, अर्चना संजय अंगाईतकर, भावना गोगटे, राधिका सागर बाहेकर, रश्मी उज्जैनकर, विना त्र्यंबक अंगाईतकर, स्वाती रितेश अंगाईतकर, प्रियंका क्षितिज कर्हे, नंदा गोपाळ अंगाईतकर, करुणा सचिन वडाळकर, मीना मानेकर, अंजली गणेश कर्हे, आशा कव्हळकर, रूपाली अमित कर्हे, निवेदिता अंगाईतकर, अनिल आसरे अनिल बैतुले, नंदकिशोर कव्हळकर, अनिल अंगाईतकर, राजेंद्र अंगाईतकर, प्रमोद वामन ठोसर, त्र्यंबक अंगाईकर, संजय अंगाईतकर, अमित अनंत कर्हे, संजय अंगाईतकर, उमेश अनासाने, गणेश कर्हे, अनिल कर्हे, पत्रकार संजय कडोळे, सुनिल गुंठेवार, माणिकराव महाराज हांडे इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी उमेश अनासाने यांनी अथक परिश्रम घेतले. तर संत नामदेव तुकाराम वारकरी मंडळ सांस्कृतिक विभागाचे तालुका प्रमुख संजय कडोळे यांनी आभार मानले.

### एक दिवशीय धम्म परिषद

**सौरभ सपकाळ मित्र मंडळाच्या वतीने खिचडी वाटप**



●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●

मंगरूळपीर नालंदा नगर येथे भीमज्योती महिला संघ जांब रोड मंगरूळपीर यांच्या विद्यमाने ता ३ जानेवारी रोजी एक दिवशीय भव्य बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते या धम्म परिषद मध्ये य सौरभ सपकाळ मित्र मंडळाच्या वतीने खिचडीचे वाटप करण्यात आली.

या परिषदेला पुज्य भिक्खु करुणानंद महाथेरो संभाजीनगर, पुज्य भिक्खु धम्मबोधी थेरो, पुज्य भिक्खु एन.धम्मानंद थेरो यांच्या प्रमुख मार्गदर्शना मध्ये धम्म परिषद मोठ्या उत्साहात पार पडली .यावेळी जिल्ह्यातील हजारोंच्या संख्येने बौध्द उपासक उपासिका उपस्थित होते या वेळी सौरभ सपकाळ मित्र परिवाराच्या वतीने २५० किलो खिचडी वाटप करण्यात आली या माध्यमातुन हजारो लोकांनी खिचडीचा आस्वाद घेतला असून सामाजिक उपक्रमाची सदैव जाणं असलेले सामाजिक कार्याची आवड असल्यामुळे कुठल्याही सामाजिक कार्यात हिरीरीने सहभागी असतात या कार्यक्रमाचे यशस्वीते साठी भीम जोटिनमहिला मंडळ मी आता परिश्रम घेतले व सोनु पेनोरे, सुधीर इंगोले, अमर भगत, ऋषिकेश शिंदे, प्रशांत खर्चे, विश्वजीत मोहोळ, नितीन डोंगरे, विश्वजीत पडघान, आशिष मनवर, सचिन चव्हाण, विर भगत, आदित्य पखाले, ऋग्वेद भगत आदींनी पुढाकार घेतला होता.

# ८ मार्चपूर्वी सर्व निर्देशांकांची शंभर टक्के परिपूर्णता साध्य करावी - जिल्हाधिकारी

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

## आकांक्षीत जिल्हा व आकांक्षीत तालुका कार्यक्रमांतर्गत 'संपूर्णता अभियान २.०'चा प्रारंभ

'संपूर्णता अभियान २.० हे केवळ प्रशासकीय कार्यक्रम नसून शासनाच्या योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. आकांक्षीत जिल्हा व आकांक्षीत तालुका कार्यक्रमांतर्गत निश्चित करण्यात आलेले निर्देशांक पूर्णत्वास नेणे, हाच या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. ८ मार्चपूर्वी सर्व निर्देशांकांची शंभर टक्के परिपूर्णता साध्य करणे हे आपले सामूहिक ध्येय आहे. त्यासाठी सर्व विभागांनी मिशन पद्धतीने परस्पर समन्वय राखून काम करावे. कोणताही लाभार्थी शासनाच्या योजनांपासून वंचित राहू नये, याची विशेष दक्षता घ्यावी,' असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.

आकांक्षीत जिल्हा कार्यक्रम व आकांक्षीत तालुका कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'संपूर्णता अभियान २.०'चा जिल्हास्तरीय शुभारंभ जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.



या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी किरण कोवे, महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय गणवीर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. एस. ठोंबरे, जिल्हा क्षयरोग अधिकारी समाधान लोणसुणे, पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. तुषार बावणे, उपशिक्षणाधिकारी गजानन डाबेराव यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी सांगितले की, नीती आयोगाने निश्चित केलेल्या एकूण ११ निर्देशांकांवर जिल्हा परिषद यंत्रणेचा विशेष भर राहील. ८ मार्चपूर्वी शंभर टक्के उद्दिष्ट साध्य करण्यासाठी महिनानिहाय नियोजन करून आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कोवे म्हणाले, जिल्हाधिकारी महोदयांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद यंत्रणा संपूर्ण क्षमतेने कार्यरत असून, ८ मार्चपूर्वी सर्व निर्देशांकांमध्ये शंभर टक्के परिपूर्णता साध्य करण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यात येईल. प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांनी जबाबदारीची जाणीव ठेवून काम केल्यास हे उद्दिष्ट निश्चितच साध्य होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या शेवटी उपशिक्षणाधिकारी गजानन डाबेराव यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमास अंगणवाडी सेविका तसेच नर्सिंग महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# बिरबलनाथ महाराज यात्रा महोत्सव निमित्त शंकरपाटाच्या आयोजन



●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

मंगरूळपीर येथे अनेक वर्षापासून तपस्वी बिरबलनाथ महाराजांचा यात्रा महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत असतो व या ठिकाणी विविध कार्यक्रमाचे आयोजन सुद्धा करण्यात येत असते

यावर्षी बिरबलनाथ यात्रा महोत्सवानिमित्त जिल्हा परिषद मैदानावर आमदार महोत्सवानिमित्त शंकर पटाचे आयोजन करण्यात आले यावेळी उद्घाटन करताना आ. श्याम खोडे कारंजा मानोरा मतदारसंघाच्या आमदार सईताई डहाके, भाजपाचे जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे व न प उपाध्यक्ष अनिल गावंडे, किंगमेकर व समाजसेवक ज्येष्ठ पत्रकार नगरसेवक प्रा. नंदलालजी पवार सर, सुनीलभाऊ मालपाणी, प्राध्यापक वीरेंद्रसिंह ठाकूर आमदार श्याम खोडे मित्र मंडळ व अनेक प्रतिष्ठित मंडळी यावेळी उपस्थित होते.

# व्याड-चिखली रस्त्याचा प्रश्न अखेर मार्गी !

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●

## भाजपाचे ॲड. नकुल देशमुख यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा

तालुक्यातील व्याड ते चिखली या अत्यंत महत्त्वाच्या रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामास अखेर प्रारंभ झाला असून, त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून त्रस्त असलेल्या वाहनचालक व नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. हा प्रश्न मार्गी लावण्यात भाजपचे युवा नेते ?ड. नकूल देशमुख यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला आणि माजी खासदार अनंतराव देशमुख यांच्या प्रभावी नेतृत्वाला यश आले आहे.

व्याड-चिखली रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने दुचाकी व चारचाकी वाहनचालकांना दररोज जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत होता. पावसाळ्यात तर परिस्थिती अधिकच बिकट होत होती. खड्ड्यांमुळे वाहने उसळणे, किरकोळ अपघात होणे, रुग्णवाहिका व शालेय वाहनांना अडचणी येणे, अशी गंभीर स्थिती निर्माण झाली होती. या समस्येबाबत व्याड व चिखली परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी होती. व्याड येथील नागरिकांनी सुरूवातीला लोकप्रतिनिधींकडे रस्ता कामासाठी निधी देण्याची मागणी केली होती. परंतु, लोकप्रतिनिधींकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला नसल्याने व्याड येथील नागरिकांनी माजी जिल्हा परिषद सदस्य स्वप्नील सरनाईक यांच्याकडे धाव घेतली. रस्त्याचा प्रश्न निकाली काढण्यासाठी स्वप्नील सरनाईक यांनी व्याड येथील नागरिकांचे शिष्टमंडळ घेऊन भाजपचे ज्येष्ठ नेते तथा माजी खासदार अनंतराव देशमुख व युवा नेते ॲड. नकुल देशमुख यांची रिसोड येथे भेट घेतली व रस्त्याच्या दुरवस्थेबाबत सविस्तर माहिती दिली. हा प्रश्न तात्पुरता नव्हे तर कायमस्वरूपी सोडवावा, अशी आग्रही मागणी त्यांनी यावेळी केली. या मागणीची गंभीर दखल घेत माजी खासदार अनंतराव देशमुख व ॲड. नकुलदादा देशमुख यांनी तत्काळ वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा सुरू केला. संबंधित विभागांशी समन्वय साधून रस्त्यासाठी पुरेसा निधी मंजूर करून घेतला. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य स्वप्नील सरनाईक, संतोष वानखडे, चिखलीचे माजी सरपंच गौतम भगत, व्याडचे उपसरपंच रामभाऊ बोरकर, गौतम वानखडे, गायकवाड, अंभोरे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# अर्धवट कामाची भूल, कठाड्याविना पूल !

## धोकादायक पुलाचे काम पुर्ण, कड्याचे काम अपूर्ण * जालना - पुलगाव महामार्गावरील प्रकार

●सिटी न्युज ब्युरो @ केनवड●

जालना-पुलगाव राष्ट्रीय महामार्गावरील मेहकर मालेगाव पिंपरी सरहद्द गावाजवळील खारोळ नाल्यावरील धोकादायक पुल करण्यात आल्याचा दावा केला जात असला, तरी प्रत्यक्षात पुलाची अवस्था आजही अपघाताला आमंत्रण देणारीच आहे. पुलावर कोणतेही सुरक्षा कठडे बसवण्यात आलेले नसल्याने हा पूल अर्धवट अवस्थेतच वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. पुलाच्या दोन्ही बाजूंना अंदाजे १० ते १५ फूट खोल उतार असून, वाहन घसरल्यास थेट नाल्यात कोसळण्याचा गंभीर धोका कायम आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी कमी प्रकाश, अरुंद पूल आणि कोणत्याही प्रकारचे दिशा-सूचना किंवा सावधानता फलक नसल्यामुळे वाहनधारकांची मोठी अडचण होत आहे. राष्ट्रीय महामार्गावरून दुचाकी, चारचाकी, ट्रॅक्टर तसेच शेतमाल वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरू असते. मात्र एवढ्या वर्दळीच्या मार्गावर मूलभूत सुरक्षा उपाय न करता वाहतूक सुरू करणे म्हणजे वाहनधारकांचे जीव थेट धोक्यात घालण्यासारखे आहे. स्थानिक नागरिक व वाहनधारकांमध्ये तीव्र नाराजी असून, 'पूल दुरुस्त केला असेल तर कठडे आणि दिशा फलक का नाहीत?' असा थेट सवाल उपस्थित केला जात आहे. अपघात झाल्यास जबाबदारी कोणाची, हा प्रश्नही उपस्थित होत आहे.



जोपर्यंत पुलावर सुरक्षा कठडे, दिशा दर्शक फलक व सावधानता सूचना बसवण्यात येत नाहीत, तोपर्यंत हा पूल सुरक्षित ठरणार नाही. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग विभागाने तातडीने या ठिकाणी सर्व आवश्यक सुरक्षा उपाययोजना करून संभाव्य अपघात टाळावेत, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.



# मूर्तीजापुर-कारंजा मार्गावर... कारचा भीषण अपघात !

## दोघाचा जागीच मृत्यू, चार गंभीर जखमी

●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●

मूर्तीजापूर वरून कारंजा कडे येत असताना उमरी जवळील वळणावर चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्यामुळे कार रस्त्याच्या खाली जाऊन आदळली त्यामुळे कारचा भीषण अपघात झाला. हा अपघात एवढा भीषण होता की कारचे अक्षरशः तुकडे झाले. या अपघातामध्ये नगरसेवक सागर अंभोरे यांचे पुतणे असल्याची माहिती मिळाली या अपघातामध्ये दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला असून चार जण गंभीर जखमी झाले आहे.



या अपघातात मृत्यू झाल्याची नावे रोहित भगवानदास रील वय २५ वर्ष रा. वाल्मिक नगर कारंजा, संकेत राजेश मेश्राम वय २५ वर्ष रा. भीमनगर कारंजा तर जखमी ची नावे आर्यन अमोल अंभोरे वय १९ वर्ष रा. कारंजा, ओम दिपक मुंदे वय १९ वर्ष रा. कारंजा, अक्षय संजय रोकडे वय २७ वर्ष रा. दादगाव कारंजा, यशवंत घनश्याम राठोड व ३१ वर्ष रा. कारंजा, घटनेची माहिती मिळताच मूर्तिजापूर येथील आपत्कालीन पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेऊन जखमींना बाहेर काढून अकोला येथील शासकीय रुग्णालयात पाठवले. अपघाताचा पुढील तपास पोलिस करीत आहे.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


## शासकीय रूग्णालय परिसरातील बेशिस्त वाहनांमुळे डोकेदुखी

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**अकोला :** शहरातील वाहतूक कोंडी ही सर्वात मोठी समस्या असून त्याला पार्किंगची असुविधा कारणीभूत ठरत आहे. याचा सर्वांनाच त्रास सहन करावा लागत आहे. त्यातच शहरातील शासकीय रुग्णालय परिसरात बेशिस्त पार्किंग, रस्त्यावर उभ्या रुग्णवाहिका व खासगी वाहनांची गर्दी यामुळे सातत्याने वाहतुकीचा खोळंबा होत असल्याने सर्वसामान्य नागरिकांसह रूग्णांच्या नातेवाईकांना डोकेदुखी ठरत आहे. विशेषतः सकाळी व दुपारी ओपीडीच्या वेळेत रुग्ण, नातेवाईक व कर्मचाऱ्यांची मोठी वर्दळ असल्याने मुख्य रस्त्यावर कोंडी निर्माण होते. परिसरात नो-पार्किंगची कडक अंमलबजावणी व वाहतूक व्यवस्थापनासाठी स्वतंत्र उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

# वैनगंगा – नळगंगा नदीजोड प्रकल्पाचे काम वर्षभरात सुरु होणार

**अकोला- बुलडाण्याला लाभ 'काटेपूर्णा'चा साठवणुकीसाठी उपयोग**

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**अकोला :** सिंचनाच्या पुरेशा सुविधा नसलेल्या विदर्भातील जिल्ह्यांचे संपूर्ण चित्रच बदलून टाकण्याची क्षमता असलेल्या महत्त्वाकांक्षी वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प सध्या विविध मान्यतांच्या टप्प्यात आहे. या वर्षातच ही प्रक्रिया पूर्ण होऊन प्रकल्पाच्या कामाला प्रत्यक्षात सुरुवात होऊ शकेल, असा विश्वास विदर्भ सिंचन विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. त्या दृष्टीने मंजुरीच्या प्रक्रियेलाही गती देण्यात आली आहे.

या प्रकल्पास २०२४ मध्ये राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाली आहे. या प्रकल्पाचा ९४ हजार ९१२ कोटी रुपये किमतीचा प्रकल्प अहवाल शासनाकडे प्रशासकीय मान्यतेच्या प्रक्रियेत आहे. हा प्रकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अग्रक्रमावर घेतला असून वेळोवेळी त्याचा



आढावा घेण्यात येत आहे. येत्या काही महिन्यांत प्रकल्पासाठी वन विभागाची मान्यता तसेच पर्यावरण मान्यतेसह प्रकल्पाचा सविस्तर प्रस्ताव मंजुरीसाठी केंद्रीय जल आयोगाकडे सादर करण्याची प्रक्रिया देखील सोबतच पार पाडली जाणार आहे. त्यामुळे वेळेची बचत होऊन विलंब टाळता येणार आहे. त्यामुळे वर्षभरात प्रत्यक्षात प्रकल्पाच्या कामाला सुरुवात होऊ शकते, असा विश्वास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

या प्रकल्पाचे स्वरुप व्यापक आहे. वैनगंगा नदीवरील गोसेखुर्द राष्ट्रीय प्रकल्पातून तापी उप-खोऱ्यामधील नळगंगा नदीवरील प्रकल्पात सुमारे १,८०४ दलघमी पाणी वळविण्यात येणार आहे. यामुळे विदर्भातील भंडारा, नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, वाशीम आणि बुलडाणा या ८ जिल्ह्यांमधील सुमारे ४ लाख ४ हजार २८१ हेक्टरचे शेतीक्षेत्र सिंचनाखाली आणता येणार आहे. याशिवाय, औद्योगिक तसेच घरगुती पाणी वापराच्या सुविधाही मोठ्या प्रमाणात निर्माण होणार आहेत.

पाणी वळविण्यासाठी सुमारे ३८८.२८ किलो मीटर लांबीच्या नदीजोड कालव्याची निर्मिती केली जाणार आहे. त्यातून वैनगंगेतील अतिरिक्त असे १,८०४ दलघमी पाणी पावसाळ्यातील ७० दिवसांच्या कालावधीत कालव्याद्वारे नेण्यात येणार आहे. नाशिकच्या जलविज्ञान प्रकल्पाकडून यासाठीच्या तांत्रिक बाबींचा अभ्यासही पूर्ण झाला असून गेल्यावर्षी सादर झालेल्या अहवालाच्या माध्यमातून ही योजना पुरेशी किफायतशीर असल्याचे स्पष्ट झाले आहे. जोड कालव्यात १३ बोगद्यांचा समावेश राहणार आहे. त्याचप्रमाणे सुमारे २९२ किलो मीटरचा उर्वरित टप्पा हा खुल्या कालव्याच्या स्वरुपात राहणार आहे. तर ८ ठिकाणी पंपाच्या साह्याने पाणी उचलावे लागणार आहे.

## उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोब 15 फेब्रुवारीपर्यंत सादर करावा

**♦ हिशोब सादर न करणाऱ्या उमेदवारांवर कायद्यानुसार कारवाई होईल**

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**अकोला :** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक लढवणाऱ्या सर्व उमेदवारांसाठी निवडणूक प्रशासनाने महत्त्वाची सूचना जारी केली आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या नियमानुसार, निवडणूक निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत खर्चाचा तपशील सादर करणे अनिवार्य असून, ही मुदत १५ फेब्रुवारी रोजी संपत आहे.

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक लढवणाऱ्या सर्व उमेदवारांसाठी निवडणूक प्रशासनाने महत्त्वाची सूचना जारी केली आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या नियमानुसार, निवडणूक निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत खर्चाचा तपशील सादर करणे अनिवार्य असून, ही मुदत १५ फेब्रुवारी रोजी संपत आहे.

निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, विहित मुदतीत खर्चाचा हिशोब सादर न करणाऱ्या उमेदवारांवर कायद्यानुसार कारवाई होऊ शकते किंवा त्यांना भविष्यात निवडणूक लढवण्यास अपात्र ठरवले जाऊ शकते. त्यामुळे सर्व संबंधित उमेदवारांनी वेळेत हिशोब सादर करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन मनपा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## अकोला बार असोसिएशन निवडणुकीत 13 फेब्रुवारीला रणसंग्राम

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**अकोला :** अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या 'अकोला बार असोसिएशन' निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत आज संपली असून, आता सर्वांचे लक्ष १३ फेब्रुवारीला होणाऱ्या मतदानाकडे लागले आहे.

अकोला बार असोसिएशनच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी जाहीर केल्यानुसार, अर्जांच्या छाननीनंतर आता उमेदवारांना आपले अर्ज मागे घेण्यासाठी ०७ फेब्रुवारी २०२६ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे. या दिवशी दुपारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवडणुकीचे अंतिम चित्र स्पष्ट होईल. त्यानंतर १३ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया पार पडेल.

अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सचिव यांसारख्या महत्त्वाच्या पदांसाठी चुरस पाहायला मिळत आहे. अध्यक्ष पदासाठी ॲड.संजय देशमुख, ॲड.हेमसिंह मोहता, ॲड.अजय वाघमारे यांच्या लढत आहे. पुरुष उपाध्यक्ष पदासाठी ॲड.विजय भंबरे , ॲड. सुमेध डोंगरदिवे, ॲड.राहूल वानखडे तर महिला उपाध्यक्ष पदासाठी ॲड.शितल गवई, ॲड.संगिता गावंडे, ॲड.शारदा मल्होत्रा, ॲड. निर्मला नागदेवे ॲड.मंजू सावरकर यांच्यात लढत होईल. तर सह सचिव पदासाठी ॲड.पाबनेश अग्रवाल, ॲड. आकाश भगत, ॲड. प्रमोद कोरडे यांच्यात लढत होईल.या निवडणुकीत जिल्हा न्यायालयातील अनेक अनुभवी आणि तरुण वकील आपले नशीब आजमावत आहेत. ७ तारखेच्या माघारीनंतर कोणते उमेदवार मैदानात राहतात, यावर अनेक समीकरणे अवलंबून असतील.

## जिल्ह्यात पाणी टंचाईसाठी आतापासून उपाययोजनांना मंजुरी

**♦ पावणेचार कोटींच्या कृती आराखड्यास कलेक्टरची मंजुरी**

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**अकोला :** अकोला जिल्यात या वर्षी उन्हाळ्यात पाणी टंचाई उद्भवू नये यासाठी २१७ उपाययोजनांचा समावेश असलेल्या ३ कोटी ८७ लाख रुपयाच्या पाणीटंचाई कृती आराखड्यास जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी मान्यता दिली आहे. जिल्यात दर वर्षी उन्हाळ्यात जिल्यातील बहुतांश गावात पाणी टंचाई ची परिस्थिती निर्माण होत असते, या करिता विविध उपयोजना राबवित ग्रामीण भागातील पाणी प्रश्न निकाली लावण्यात येत असतो. यावर्षी अकोला जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी जिल्ह्यात उन्हाळ्यामध्ये कुठेही पाणीटंचाई निर्माण होऊ नये याकरिता ३ कोटी ८७ लाख रुपयाचे पाणीटंचाई आराखड्याला मंजुरात दिली आहे. सदर प्रस्ताव जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून जिल्हा प्रशासनाला प्राप्त झाला होता. संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन आराखड्यात १८८ गावांचा समावेश करण्यात आला आहे. अकोला तालुक्यातील १६, बार्शिटाकळीतील ४९, बाळापूरमधील ११, पातूरमधील ५०, मूर्तिजापूरमधील २४, अकोटमधील १८ व तेल्हारा तालुक्यातील २० गावांचा समावेश करण्यात आला आहे. उपाययोजनांत विहिर अधिग्रहणाची १२९, विहीर खोलीकरणाची ९, नळयोजना विशेष दुरूस्तीची ११, विंधनविहीरींची ४५ व कूपनलिकांची २३ कामे प्रस्तावित करण्यात आली आहे. त्यानुसार कामांचे प्रस्ताव सादर करण्याबाबत निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले आहेत.

## अक्षय नागलकर खून प्रकरण, अंतिम चार्जशीट न्यायालयात लवकरच

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**अकोला :** सर्वत्र गाजलेल्या अक्षय नागलकर खून प्रकरणाचा पोलिसांनी तपास पूर्ण करून अंतिम चार्जशीट न्यायालयात दाखल केली आहे. डीएनए सँपल, फॉरेंसिक रिपोर्ट प्राप्त झाला असून आणखी काही महत्त्वाचे रिपोर्ट यायचे आहेत. ते आले की डॉक्यूमेंट तयार करून पुरवणी चार्जशीट न्यायालयात दाखल करू असे उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन पाटील यांनी सांगितलेपोलिस अधीक्षक, अतिरिक्त पोलिस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा टीम, डाबकी रोड पोलिस स्टेशनचे



प्रभारी अधिकारी यांचे सहकार्य लाभले असे सुदर्शन पाटील म्हणाले.

या प्रकरणात आरोपींना जामीन मिळू नये याकडे आमचे लक्ष आहे.

एका आरोपीने जामीन मिळवण्यासाठी प्रयत्न केला होता परंतु प्रकरणाचे गांभीर्य न्यायालयाला सांगितले आणि न्यायालयाने जामीन नामंजूर केला अशी माहिती दिली.

## जिल्ह्यातील तापमानात वाढ ; रब्बी पिकांवर उष्णतेचा परिणाम

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**खामगाव :** हिवाळ्याचे दिवस सुरू असले तरी जिल्ह्यात दिवसा तीव्र उन्हाचा चटका जाणवत आहे. रात्री मात्र थंडीचा प्रभाव कायम असल्याने रब्बी पिकांवर उष्णतेचा परिणाम होत आहे.

दिवसेंदिवस दिवसाच्या तापमानात वाढ होत असल्याचे चित्र आहे. बुधवारी जिल्ह्यात किमान तापमान १६ अंश सेल्सिअस नोंदविण्यात आले. किमान तापमानात काहीशी वाढ झाली असली तरी रात्रीचा गारवा अद्याप जाणवत आहे. मात्र, कमाल तापमान ३० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचल्याने दिवसा उष्णतेचा त्रास वाढला आहे. तापमानातील या वाढीचा थेट परिणाम रब्बी पिकांवर होत असून, गहू, हरभरा आदी पिकांवर उष्णतेचा ताण दिसून येत आहे. अचानक बदललेल्या हवामानामुळे पिकांच्या वाढीवर परिणाम होण्याची शक्यता शेतकऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, कृषीतज्ज्ञांनी शेतकऱ्यांना पिकांची योग्य काळजी घेण्याचा सल्ला दिला असून, पाणी व्यवस्थापन व आवश्यक त्या संरक्षणात्मक उपाययोजना करण्याचे आवाहन करण्यात आले आहे

## थकीत मालमत्ता करावरील शास्ती माफ करण्यासाठी 'शास्ती अभय योजना' लागू करा : निलेश देव

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**अकोला :** शहरातील सर्वसामान्य मालमत्ता धारकांना दिलासा मिळावा तसेच महानगरपालिकेची थकीत कर वसुली वाढावी, यासाठी थकीत मालमत्ता करावरील शास्ती (दंड) माफ करणारी 'शास्ती अभय योजना' तातडीने लागू करावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे गटनेते नगरसेवक निलेश देव यांनी केली आहे. याबाबत त्यांनी महापौर शारदाताई खेडकर यांना निवेदन दिले.

शहरात खाजगी कंपनीमार्फत कर वसुलीची कंत्राटी पद्धत लागू करण्यात आली होती. महाराष्ट्रात कोणत्याही महानगरपालिकेत नसलेली ही पद्धत अकोल्यात राबविण्यात आल्याने कर वसुली प्रक्रियेत अनेक त्रुटी निर्माण झाल्या. चुकीच्या व अव्यवस्थित कर आकारणीमुळे नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरसमज, नाराजी व असंतोष निर्माण झाला.

मागील वर्षी प्रशासकीय काळात दोन वेळा शास्ती अभय योजना राबविण्यात आल्या होत्या. मात्र या योजना ऐन दसरा व दिवाळी या सणांच्या काळात लागू करण्यात आल्याने अनेक नागरिकांना आर्थिक अडचणींमुळे त्याचा लाभ घेता आला नाही. त्यामुळे सध्या नागरिक कर भरण्यास तयार असले तरी शास्तीमुळे अडचण निर्माण होत असल्याचे निलेश देव यांनी स्पष्ट केले. प्रशासकीय काळात २०२३ पासून मालमत्ता हस्तांतरण शुल्कात अतिरिक्त १ टक्का वाढ करण्यात आली आहे. ही वसुली खाजगी संस्थेमार्फत होत असल्याने हस्तांतरण प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात विलंब होत आहे. राज्यातील इतर महानगरपालिकांमध्ये हस्तांतरण शुल्क हे नाममात्र निश्चित (१०००) असताना अकोल्यात टक्केवारी पद्धतीने शुल्क आकारणे नागरिकांवर अन्यायकारक आर्थिक भार टाकणारे असल्याचे निलेश देव यांनी सांगितले. शास्ती अभय योजना राबविल्यास नागरिकांना आर्थिक दिलासा मिळेल, थकीत करांची जलद वसुली होईल तसेच महानगरपालिकेच्या महसुलात लक्षणीय वाढ होईल, असा विश्वास निलेश देव यांनी व्यक्त केला.

## विवाहितेच्या आत्महत्येप्रकरणी पतीसह पाच जणांवर गुन्हा

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**खामगाव:** नांदुरा तालुक्यातील वडाळी येथील वर्षा जयंत वक्टे (३५) या विवाहितेने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याप्रकरणी नांदुरा पोलिसांनी पती, सासू-सासरे तसेच जेठ आणि दीर अशा पाच जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वडाळी येथील सार्वजनिक विहिरीत वर्षा वक्टे यांचा मृतदेह आढळून आल्यानंतर नांदुरा पोलिसांनी प्रथम आकस्मीक मृत्यूची नोंद केली. या प्रकरणात मृतक वर्षा हिचा भाऊ संदीप सोपान फरपट (३०, रा. आमसरी) याने नांदुरा पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. फिर्यादीत नमूद केल्यानुसार, मागील सुमारे १५ वर्षांपासून वर्षा हिचा पती जयंत वक्टे दारूच्या व्यसनाधीन असून, माहेरून पैसे आणण्यास तसेच शेतीतील हिस्सा मागण्यासाठी तिला वारंवार शारीरिक व मानसिक त्रास देत होता. सासू शांताबाई वक्टे, सासरे वामन वक्टे, जेठ अनंता वक्टे व दीर अमोल वक्टे हे सर्वजण पतीला चिथावणी देत असल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. या सततच्या छळामुळे मानसिकदृष्ट्या खचलेल्या वर्षा वक्टे यांनी शेतातील विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. वरील सर्वांनी तिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप असल्याने नांदुरा पोलिसांनी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०८, ८५ व ३(५) अन्वये गुन्हा नोंदविला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक आवारे करीत आहेत.

## एसटी घसरली ; 11 प्रवासी जखमी, जीवितहानी टळली

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**खामगाव :** एसटी बस रस्त्यावरून घसरल्याने झालेल्या अपघातात ११ प्रवासी जखमी झाले. मोताळा तालुक्यातील खेडी नजीक मंगळवार, ५ फेब्रुवारी रोजी ही घटना घडली. जखमी प्रवाशांवर बुलढाणा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार करण्यात आले असून, सुदैवाने कोणालाही गंभीर इजा झाली नाही. बुलढाणा आगाराच्या वतीने तत्काळ मदत देण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मलकापूर आगाराची एसटी (क्रमांक सकाळी एमएच-४०/एल-९४८६) मलकापूर येथून कुन्हा गोतमारा येथे गेल्यानंतर परतीच्या प्रवासात होती. खेडी परिसरात रस्त्याचे काम सुरू असल्याने दोन वाहने समोरासमोर उभी राहिली. साईड देण्याच्या प्रयत्नात चालकाचा ताबा सुटून एसटी रस्त्यावरून घसरली.

या अपघातात जयवंताबाई विनोद सुरडकर (३६), मालती कुलदीप धाडे (१९), मंदा अजय जाधव (३०), आशा अर्जुन घुले (४२), अजय ज्ञानदेव जाधव (३५), जयसिंग कतारसिंग धोती (६२), बजेसिंग नारायण साबळे (६२), नंदलाल कतारसिंग धोती (६२), चंद्रकला जगन्नाथ नोके (६६), रोशनी विकास डांगे (२०) आणि शांताबाई तोताराम नोके (७०) असे एकूण ११ प्रवासी जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक रहिवाशांनी सरपंचांच्या नेतृत्वाखाली मदतकार्य राबवून जखमींना जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविले. तेथे सर्व जखमींवर उपचार करण्यात आल्याची माहिती मलकापूर आगारप्रमुख मुकुंद न्हावकर यांनी दिली.

## देशमुख महिला मंडळाच्या अध्यक्ष राजश्री देशमुख यांना संकल्प प्रतिष्ठानचा सामाजिक पुरस्कार जाहीर

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**अकोला :** समाजकार्याला निःस्वार्थ भावनेने वाहून घेतलेल्या व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्याची परंपरा जपणाऱ्या संकल्प मित्र परिवार प्रतिष्ठान, अकोला यांच्या वतीने सन २०२५-२६ या वर्षातील विविध सामाजिक पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. यामध्ये देशमुख महिला मंडळाच्या अध्यक्ष राजश्री देशमुख यांच्यासह आठ जणांना जाहीर झाला आहे.

वऱ्हाड प्रांतातील जनसामान्यांच्या सेवेसाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांना यंदाही सन्मानित करण्यात येणार आहे. समाजातील उपेक्षित, गरजू, शेतकरी, महिला, दिव्यांग तसेच शैक्षणिक क्षेत्राशी संबंधित घटकांसाठी सातत्याने कार्य करणाऱ्या व्यक्तीच्या योगदानाची दखल घेत हे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. समाजसेवेतील प्रामाणिकता, कार्याची सातत्यशीलता, स्थानिक पातळीवरील परिणामकारकता आणि मानवी मूल्यांप्रती असलेली बांधिलकीचा आधारे निकषांच्या पुरस्कारार्थीची निवड करण्यात आली आहे.

या पुरस्कारांची निवड संकल्प मित्र परिवार निवड समितीमार्फत करण्यात आली. समितीत ज्येष्ठ साहित्यिक सुरेश पाचकवडे, समाजसेवक सुधाकर गीते, तुळशिदास खिरोडकार, सिद्धार्थ शर्मा, संजय खांडेकर आणि संतोष खंडेलवाल यांचा समावेश होता. समाजातील विविध स्तरांवर कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कामाचा सखोल अभ्यास करून ही नावे निश्चित करण्यात आल्याचे प्रतिष्ठानतर्फे सांगण्यात आले. प्रतिष्ठानच्या दहाव्या वर्धापन दिन सोहळ्यात पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

यावर्षी जाहीर करण्यात आलेल्या सन्मानांमध्ये सहाय्यक कृषी अधिकारी बळीराजा सेवा सन्मान पुरस्कार अशोक करवते, सेवाभावी उद्योजक पुरस्कार सेवा फाउंडेशनचे वैभव वानखडे, तसेच संकल्प सेवा सन्मान पुरस्कारांत संतोष बायस्कर, कर्मयोगी गाडगेबाबा रक्तदाता संघ, कांचन पटोकर, डॉ. प्रदीप अवचार, ओपन विंग्स, राजश्री देशमुख देशमुख महिला मंडळ, अनिता इंगळे, एक पाल्य सेवा संघ आणि विजय धरमकर संचालक, श्रीनाथ वृद्धाश्रम यांची निवड करण्यात आली आहे.

## शिष्यवृत्तीचे महाविद्यालय स्तरावर तीन हजार अर्ज प्रलंबित

प्रतिनिधी ६ फेब्रुवारी

**अकोला :** विविध शिष्यवृत्ती योजनांतर्गत सुमारे तीन हजार अर्ज महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असून, संबंधित महाविद्यालयांनी त्यांची तत्काळ पूर्तता करावी, अशी सूचना समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त मारोती वा' यांनी केली आहे.

अनुसूचित जाती विद्यार्थ्यांसा'ी प्रवर्गातील भारत सरकारची मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, राज्य शासनाची शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसा'ी निर्वाह भत्ता या योजना महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहेत. उपलब्ध माहितीनुसार, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये २३१, २०२३-२४ मध्ये ९४ आणि २०२४-२५ मध्ये ४७१ अर्ज महाविद्यालय स्तरावर प्रलंबित आहेत. चालू शैक्षणिक वर्ष संपण्यास अवघे दोन महिने शिल्लक असल्याने, सर्व महाविद्यालयांनी आवश्यक ती कार्यवाही करावी, असे आवाहन सहायक आयुक्त वा' यांनी केले आहे.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK